दम आपल्या मुखावरील बुरखा फेंकून दिला व आरक्त नेत्र करून दूतांस ह्मणाली.—" भित्र्यांनो, कशाला जिवंत राहिलांत ? क्षिप्रा नदींतच आपला देह विसर्जन कां नाहीं केलात ? तुमचा तो भित्रा धनी रणभूमींतून पळून आल्यामुळें, त्यानें आपल्या शुद्ध वंशास कलंक लाविला आहे. ह्मणून ह्या पवित्र किल्ल्यांत तो पुनरपि मुळींच येऊं शकणार नाहीं. तो क्षत्रिय नव्हे. त्याचा जन्म क्षत्रियवंशांतला नव्हे. आणि तो माझा पति पण नव्हे ! अतःपर त्याचें मुखावलोकन मी करणार नाहीं ! मी मेवाडच्या युद्धवंशांतली (प्रतापसिंहाच्या) मुलगी आहे. त्या कुलाशीं संबंध करणारे, असे भीरु, रणविमुख किंवा पळपुटे कसे बरें असतील ? युद्धांत जय मिळत नव्हता, तर लढतां लढतां तरी प्राण द्यावयाचा होता. " ह्याप्रमाणें बोलून सिंहिणीप्रमाणें गर्जत ती दूताकडे पहात असतां पुन्हां त्यांना उद्देशून बोलूं लागली–" भित्र्या दूतांनो, अझूनपर्यंत तुह्मी येथें उभेच आहांत काय ! अरे, येथें आमचे कोणी शिपाई आहेत ! असल्यास, ह्या पळपुट्याच्या दूतांना ह्या पहाडावरून खालीं ढकलून द्या व किल्ल्याचें दार बंद करा. "

ह्याप्रमाणें ती बोलत असतांना तिचें शरीर क्रोधावेशानें थरथरूं लागलें व मुखकांति रक्तवर्ण झाली. हें पाहून दूत भयानें मागें पाय घेऊं लागले. तेव्हां नरेंद्र

पुढें होऊन आपल्या गंभीर स्वरानें ह्मणाला—महाराणी! आम्हा दीनदासांला जी आज्ञा झाली, ती शिरोधार्य आहे. पण आपण महाराज यशवंतसिंहाला भित्रा किंवा पळपुत्या ह्मणूं नये. त्या रणधुरंधराला विद्युत्गतीनें शस्त्रसंचार करितांना रणांत ह्या डोळ्यांनीं मीं पाहिलें आहे. जोंपर्यंत ह्या देहांत जीव आहे, तोंपर्यंत तर तो संग्राम आणि तो अद्वितीय वीर मी विसरणार नाहीं!

हें नरेंद्राचें भाषण ऐकून राणी स्थिर दृष्टीनें त्याजकडे पहात हळुहळु बोलूं लागली—दूता! खराच कां त्यांनीं असा पराक्रम गाजविला? तूं परदेशाहून आलेला दिसतोस, तुला कांहीं भय नाहीं. खरें खरें काय आहे, तें अक्षरशः सांग.

नरेंद्रानें प्रथम लढाईचें वर्णन करून रजपुतांचें जें साहस व जें वीरत्व त्यानें पाहिलें होतें, तें सारें साद्यंत निवेदन केलें, आणि अखेरीस ह्मणाला—"वर्षाऋतूंतील ढगांप्रमाणें मोंगलांनीं चोहोंकडून यशवंतसिंहाला वेढून घेतलें व त्यामुळें रणभूमि केवळ अंधःकारमय झाली. भित्रा कासिमखां रणांतून पळून गेला. तरी, महाराजांनीं धैर्य न सोडतां लढणें चालूंच ठेविलें. हजारो रजपूतांनीं तो प्रदेश आणि क्षिप्रानदी ह्यांतून आपल्या रक्ताचे पाट वाहविले व अखेरीस आपली कीर्तिपताका फडकत ठेवून देवलोकीं प्रयाण केलें. ह्यावेळीं महाराज

यशवंतसिंह यांचेजवळ फार थोडे रजपूत राहिले होते. ही वेळ साधून औरंगजेब व मुराद यांनीं लक्षावधि मोंगल सेनेसह महाराजावर हल्ला केला. पण महाराजांनीं अशा संकटकाळीं देखिल धैर्य सोडिलें नाहीं. पुष्कळ रजपूत अक्षय कीर्ति मिळवीत रणांगणांत पडूं लागले व त्यामुळें त्यांची सेना कमी होऊं लागली. मोंगलांच्या जयनादानें आकाश व पृथ्वी कंपायमान झाली; पण महाराजांचें रणकर्कश हृदय कंपायमान झालें नाहीं ! आठहजार रजपूतांतून आठशेही जिवंत राहिले नाहींत, पण महाराजांनीं रणाचा त्याग केला नाहीं. राणी साहेब ! त्या घोर युद्धास व महाराजाच्या अतुल पराक्रमास अघोरकल्लोलिनी क्षिप्रा व भीषणाकार विंध्यपर्वत हीं साक्ष आहेत."

नरेंद्राचें भाषण ऐकून राणीचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून आले. व ती म्हणाली–" तर मग यशवंतसिंहांनीं अखेरपर्यंत शत्रूंशीं लढून रजपुत नांव कायम ठेविलें आहे तर एकुण ! विदेशीय दूता, तुझ्या बोलण्यानें माझें हृदय शीतल झालें आहे !

नरेंद्र म्हणाला–मनुष्याच्यानें जें होऊं शकतें व देव ज्याच्या साधनांत संतोषित आहेत, तेंच महाराज यशवंतसिंहांनीं केलें. म्हणजे, मोंगल सैन्यांशीं लढतां लढतां जेव्हां त्यांचेजवळ केवळ पांचशे लोक राहिले, तेव्हां ते रणामधून निघून गेले.

" निघून गेले, म्हणजे पळून गेले, असंच कीं नाहीं ? शिव शिव ! रजपूत म्हणवून हें कर्म ? क्षात्रिय म्हणविणाराचें हें अधैर्य ? हाय, हाय " असें ह्मणून वक्ष स्थल पिटीत असतां राणी मूर्छित झाली. राणीची ही स्थिति पाहून दासींनीं तिच्या तोंडावर पाणी शिंपिलें व तेणेंकरून ती थोडक्या वेळांत सावध होऊन दुःखानें म्हणूं लागली.—दासीनों, चितेची तयारी करा. आज माझे प्राणपति लढाईंत झुंजत असतां, त्यांनीं ह्या लोकाचा त्याग केला व आतां ते स्वर्गांत बसून माझी वाट पहात आहेत. म्हणून त्याला भेटावयाला मला लवकर गेलें पाहिजे. यशवंतसिंहाचें नांव धारण करून कोणी धूर्त आला आहे, तेव्हां त्याची भेट मी काय ह्मणून घेऊं ? आणि हे दूतांनो, तुम्ही आतांच्या आतां मारवाडच्या हद्दीबाहेर व्हा. उशीर मुळींच करूं नका. नाहीं पेक्षां तुमचीं शिरें धडापासून वेगळीं होतील.

नरेंद्र आपल्या सोबत्यांसह किल्ल्याच्या बाहेर निघाला व राणीच्या आज्ञेप्रमाणें किल्ल्याचें दार बंद झालें. बाहेर जातेवेळी जोधपूरच्या प्रधानानें त्याच्याजवळ एक पत्र देऊन पुढील शब्दांनीं त्याची रवानगी केली. तो ह्मणाला.—दूतांनों, आतां तुह्मांला महाराजाकडे (यशवंतसिंहाकडे) जावयाची आवश्यकता नाहीं. तुम्ही हें पत्र घेऊन सरळ उदेपुरास जा. तेथील राणा

साहेब तुम्हाला आश्रय देतील. महाराणीची आई ही तेथेंच आहे. ती, हें पत्र पोंचतांच येथें येईल. कारण, तिच्यावाचून दुसरें कोणीही महाराणीला शांत करूं शकत नाहीं. दुतांनों, जा आतां, महाराणीच्या आज्ञें-प्रमाणें तुम्हाला फार वेळ मारवाडच्या हद्दींत ठेवतां येत नाहीं. "

याप्रमाणें प्रधानाची आज्ञा घेऊन नरेंद्र आपल्या सोबत्यांसह उदेपुरास निघून गेला.

इतिहासकारांनीं लिहिलें आहे कीं जोधपूरची महाराणी आठ नऊ दिवसपर्यंत केवळ उन्मत्तप्राय दिसत होती. उदेपुराहून तिची आई आल्यावर ती जरा शांत होत्साती तिच्या समजावणीनें एकदांची मोठ्या कष्टानें यशवंतसिंहाचें दर्शन घ्यावयास सिद्ध झाली. व यशवंत-सिंहही पुन्हां अवाढव्य सेना जमवून औरंगजेबाशीं युद्ध करणार, हें ठरलें.

प्रकरण विसावें.

उदेपूर.

He lingered pouring on memorials of the world's
Youth; through the long burning day.
Gazed on those speachless, nor when the moon.
Filled the magisterial halls with floating shades—.
Suspended he that task, but ever gazed,
And gazed, till meaning on his vacant mind,
Flashed like strong inspiration.

'Shelly.'

मेवाडची जुनी राजधानी चितूर. आणि हल्लींची उदेपूर. मारवाडांतील मरुभूमी व तदंतर्गत रेतींचीं मैदानें हीं ओलांडून नरेंद्र मेवाड प्रांतांतील डोंगराळ प्रदेशांत आला, आणि तेथें त्याला पूर्वीपेक्षां आनंदही वाटला. अरवली पर्वताला ओलांडित असतां त्यांतून निघणाऱ्या नद्या वगैरे पाहून पर्वतावरील

वनश्रीनें आनंदीत होत्साता तो जोधपुरांतील दूतांबरोबर उदेपुरास पोंचला. हें शहर पाहून नरेंद्राला फार समाधान झालें. त्यानें असें सुंदर आणि रमणीय स्थान पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें. उदेपूर शहर डोंगरावर वसलें असून त्याच्या पायथ्याशीं एक सुंदर, शांत आणि प्रशस्त सरोवर, आकाश व आसमंतात् भागांतील पर्वतश्रेणी यांची छाया आपल्या वक्षावर घेत आहे, चोहोंकडे पर्वतांचीं शिखरेंच शिखरें दिसत आहेत. जणूंकाय सृष्टिसौंदर्य देवता पर्वतरूपी उंच गच्चीवर बसून ह्या आनंदनिवास स्थानाची रक्षाच करीत आहे! सरोवराजवळच्याच एका पर्वतश्रेणीवर असलेला सुंदर राजमहाल व पांढऱ्या संगमरवरी दगडांच्या बांधलेल्या गच्च्या, जणूंकाय मंदहास्य मुद्रेनें सरोवरांतील निर्मळ उदकास स्वच्छ आरसाच मानून त्यांत आपलें रूप न्याहाळीत आहेत ! ही सर्व शोभा पाहून नरेंद्राला वाटलें कीं गौरव, यश व वीरत्व हीं ह्या पर्वतराशींमधून चिरकालिक वास करीत असून प्रसन्न अंतःकरणानें शूरवीर रजपुतांना उत्साह देत त्यांचें रक्षणच करीत आहेत !

ह्याप्रमाणें शोभा पहात नरेंद्रानें जोधपूरच्या दूतांसह " सूर्यद्वारानें उदेपुरांत प्रवेश केला. ह्यावेळीं उदेपूर व जोधपूर ह्यांत शरीरसंबंध असल्यामुळें ह्या दूतांच्या आगमनानें नागरिकजन आनंदीत होत्साते जयघोष करूं-

लागले. ह्याप्रमाणें ते शहरांतील राजमार्गानें राजवाड्याकडे जात असतां चारणांनीं मंगल गायन करून व राजाश्रित स्त्रियांनीं मंगलगीतें गाऊन त्यांचा सत्कार केला. त्यांनींही त्या लोकांना यथोचित इनामें देऊन संतोषित केलें व राजमहालांत प्रवेश केला.

राजमहलांत पोंचल्यावर राजाची आज्ञा होतांच नरेंद्र वगैरे दूत संगमरवरी जिन्यानें सूर्यमहालांत पोंचले. ह्या महालांत उदेपूरचे राजेसाहेब परदेशीय राजे व राजदूत यांची भेट घेत असत. ह्या महालाच्या एक्या भिंतींत तेथील राजवंशाचा मूळपुरुष जो सूर्य, त्याची प्रतिमा कोरली होती, व यामुळेंच त्याला सूर्यमहाल असें नांव पडलें होतें. लाल मखमलीनें मढविलेल्या व त्यावर बहुमूल्य रत्नादिकांचें कुसर काम केलेल्या राजसिंहासनावर बाप्पा रावळाचे वंशावतंस महाराणा राजसिंह बसले असून समोंवती असलेल्या रौप्य स्तंभाचे आधारावर मणि मौक्तिकांनीं विभूषित असा चांदवा फडफडत होता. थोड्या अंतरावर राजपरिचारक व चरणादि स्तुतिपाठक आपापल्या स्तुतिपाठानें ह्या अमरावतितुल्य राजसभेचा बडेजाव गात होते, अशा वेळेस वर निर्दिष्ट केलेले नरेंद्रादि दूत राजसभेत आले व त्यांनीं नम्रतेनें जोधपुराकडील समाचार राजांस कळवून प्रधानांनें दिलेलें पत्र त्याचेजवळ दिलें. यशवंतसिंहाचा पराभव, त्याचें विमुख होऊन स्वदेशीं

दुर्दशा येणें, महाराणीचा राग व त्यामुळें यशवंतसिंहाची दुर्दशा इत्यादी समाचार ऐकून राजास फार दुःख झालें. तरी तें त्यानें आवरून आलेल्या दूतांला सन्मानपूर्वक चांगल्या स्थळीं उतरविण्याची व्यवस्था करण्याबद्दल आपल्या प्रधानास सांगितलें.

थोडक्याच दिवसांनीं उदेपूरची महाराणी आपल्या मुलीची समजूत करावयास जोधपुरास निघून गेली.

नरेंद्र कांहीं महिने उदेपुरास राहून त्यानें सर्वांची प्रीति संपादन केली. हेमलतेची मूर्ति त्याच्या हृदयमंदिरांत कायमची कोरलेली असून तिचें चिंतन तो नेहमीं करीत असे. तरी ह्या वीरप्रसविनी भूमींतील अनेक ऐतिहासिक स्थलांच्या दर्शनानें तें चिंतनसुद्धां कांहीं वेळपर्यंत बंद झालें. उदेपुराहून थोड्याच अंतरावर पुष्कळ युद्धस्थळें, अनेक कीर्तिस्तंभ व कितिएक देवालयें आहेत. नरेंद्र, एकामागून एक हीं स्थानें पाहूं लागला कधीं एकटा तर एकटाच, आणि कधीं बाल ज्योतिषाला (यवनबालकाला) बरोबर घेऊन आसमंतात् भागांतील पर्वतशृंगावरील देखावे पहात तो फिरत असे. कधीं सरोवराच्या ह्या बाजूवरून त्या बाजूस, कधीं ह्या पर्वतावरून त्या पर्वतावर व कधीं ह्या रणभूमींतून त्या रणभूमींतही तो जात असे. प्रत्येक पर्वत त्याला राजपुतांचा कीर्तिस्तंभ वाटे, म्हणून तो कधीं कधीं सकाळपासून दोन प्रहर व दोनप्रहरपासून

सायंकाळपर्यंत पर्वताच्या खिंडीखिंडींतून फिरत असे. किंवा एखाद्या कीर्तिस्तंभानजिक बसत असे. त्यास पाहून सकाळीं खेळावयास निघालेलीं रजपुतांचीं मुलें, हा फिरणारा अपरिचित मनुष्य कोण, म्हणून याजकडे बोटें दाखवीत. त्याचप्रमाणें सरोवरावर पाणी भरूं येणाऱ्या स्त्रियाही 'हा विदेशी पुरुष कोण असावा' ह्याबद्दल आपापल्यांत भवति न भवति करीत. बालज्योतिषी निस्तब्ध भावानें नरेंद्राच्या मागें मागें फिरून त्यानें सांगितलेलें काम करीत असे. सायंकाळीं नरेंद्रास नौकेंत बसवून स्वत: वल्हवीत ती नौका उदेपुरास नेई. वल्हवीत असतां त्यानें कधीं कधीं आनंदानें गाणें म्हणावें. त्याच्या बालकंठाचा प्रतिध्वनि पर्वत, सरोवर व आकाश ह्यांत गुंजून तें ऐकणाराला फार मोह उत्पन्न करी. नरेंद्र शांत चित्तानें तें ऐकत असे व त्यामुळें त्याच्या हृदयांत पूर्वी घडलेला इतिहास जागृत होई. गाणें तातारीय भाषेंत होतें. ह्मणून नरेंद्र तें नीट समजत नसे. तरी मधून मधून परिचयाचे एक दोन शब्द त्याच्या लक्षांत येतांच, तें प्रेमगीत आहे असें त्याला वाटे. बिचारा दुर्दैवी बालक! ह्या छोट्याशा वयांतच तो प्रेमानें वेडा झाला होता. पण ह्या वेडेपणांतही नरेंद्राची सेवा तो एकनिष्ठतेनें करी.

ह्याप्रमाणें कांहीं काळ लोटला व क्रमशः आश्विन महिन्यांतील नवरात्राचे दिवस आले.

प्रकरण एकविसावें.

नवरात्र.

Go where glory waits thee.

"Moore"

वर्षाकाल संपून नुकताच शरदऋतूस आरंभ झाला होता. भूदेवी हिरवा शालू नेसल्यामुळें फार सुंदर दिसत होती. राजस्थानांत युद्धास योग्य काल हाच असल्यामुळें, लोक नवरात्र पूजेबरोबर खड्गपूजाही उरकून घेत होते.

आश्विन महिन्यांतील नवरात्रप्रसंगीं नरेंद्रानें देवीपूजनाचा जो थाट पाहिला, तो अवर्णनीय होता. पूर्वजांनीं जीं शस्त्रास्त्रें घेऊन युद्धांत जय मिळविला, किंवा रणांगणांत प्राण दिले; तीं शस्त्रास्त्रें शस्त्रागारांतून काढून प्रत्येक क्षत्रिय वीर त्यांची पूजा करण्यांत निमग्न झाले. अंबिका मंदिरांतून प्रतिदिनीं रेडे व बकरे यांचें बलिदान होऊं लागलें. मोठमोठ्या मैदानांत योद्धेलोक दररोज जमा होऊन आपआपलें कौशल्य दाखवूं लागलें. ह्याप्रमाणें ह्या महोत्सवांत सर्व लोक वीरोचित् तेजानें जिकडे तिकडे फिरत असलेले दिसूं लागले.

दशमीचे दिवशीं मोठ्या समारंभानें भगवतीची पूजा होऊन दूसरे दिवशीं महाराण्याच्या आज्ञेनें सर्व वीर रंगस्थळीं जमले. तो समारंभ पाहून नरेंद्र फार विस्मित झाला.

सारें उदेपूर शहर, जणुकाय ह्या समारंभामुळें नटलें होतें ! घरें, दारें व दुकान पुष्पपल्लवांनीं युक्त. जिकडे तिकडे पताका व तोरणें. प्रभातकालीन बालरवींचीं किरणें जिकडे तिकडे पसरल्यामुळें सर्वच सुवर्णमय झाल्यासारखें दिसत होतें. अशावेळीं जयध्वनि करीत सर्व रजपूतवीर व उदेपूरचें सैन्य रणांगणाकडे चाललें होतें. त्याचप्रमाणें राजाचे मांडलिक आपापल्या सैन्यसामंतासह अनेक ठिकाणांहून उदेपुरास राजदर्शनास येत होतें. नानाप्रकारच्या लोकांचे नानाप्रकारचे अश्व, नानाप्रकारचे पोषाक, नानाप्रकारच्या पताका आणि नानाप्रकारचे वाद्यध्वनि यांहींकरून उदेपूर शहर गजबजून गेलें होते. अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांनींयुक्त असे पंचवीस हजार शूर रजपूत उदेपूरच्या महाराणाजीस वेष्टून रणांगणास चालले होते. ह्या सैन्याच्या शौर्यभयानें दिल्लीश्वराचें सिंहासन बरेंच वेळा कंपित झालें होतें !

प्रहरभर दिवस आला होता. सर्वत्र वीर रणांगणांत जमून आपापलें वीरत्व, आपापलें शस्त्रसंचालन व घोडा मरधांव फेंकण्याचें कौशल्य दाखवूं लागले. वीरांच्या पदभारानें भूमि कंपायमान होऊं लागली व

जयध्वनीनें आकाश गुंजू लागलें. मधून मधून चारण लोकांचा जयजयकार व पूर्वज पराक्रमवर्णन चाललेंच होतें.

हें वर्णन संपतांच महाराण्यानें आपल्या घोड्यावर उडी मारून आरोहण केलें व म्यानांतून तरवार काढिली. त्याबरोबर, उभे असलेल्या पंचवीस हजार रजपूतांच्याही तरवारी बाहेर निघाल्या व जयजयकारानें आकाश फाटेल कीं काय, असें वाटूं लागलें. तमाम रजपूत युद्धलीलेंत निमग्न झाले. नरेंद्रानेंही त्यांचेंच अनुकरण केलें.

वर सांगितलेल्या रणांगणांत येतेवेळीं नरेंद्र घोड्यावर स्वार होऊन आला होता. व त्याच्याबरोबर त्याचा नौकर हातीं भाला घेऊन त्याच्या घोड्यामागें होता.

नरेंद्रानें त्या दिवशीं युद्धलीलेंत आपलें बरेंच चातुर्य दाखविलें. रजपूताबरोबर लढतांना तो कधीं जिंकला व कधीं हरला. अखेरीस घोड्यास किंचित विसावा देण्याकरितां तो त्यावरून उतरून एका झाडाखालीं बसला व नौकर, घोड्यास एकीकडे बांधून नरेंद्राकरितां पाणी आणावयास जवळ असलेल्या एका झऱ्यावर गेला. पण मागल्या पायींच तो परत येऊन नरेंद्रास म्हणाला—" महाराज एक घोडेस्वार त्या झऱ्यांतील पाणी मला घेऊं देत नाहीं. तो म्हणतो कीं, ह्या झऱ्याचें पाणी वीर पुरुषावांचून कोणालाही देण्याचा अधिकार नाहीं. त्या बंगाल्यानें

प्रथम आंपलें शौर्य दाखवावें व नंतर येथल्या पाण्यास हात लावावा ”

हा निरोप ऐकून नरेंद्रास राग आला व तो लगबगीनें घोड्यावर बसून “ तो उर्मट मनुष्य कोण आहे ” तें पहावयास झऱ्याजवळ आला. तेथें पहातो तो, एका जंगी काळ्या घोड्यावर एक काळा पोशाख केलेला योद्धा त्याच्या दृष्टीस पडला. ह्या योद्धानें आपलें सर्व शरीर झांकून घेतलें असून तो बराच वयातित झाला असावा असें दिसत होतें. तरी पण त्याचे ते पाणीदार डोळे व पीळदार शरीर पहातांच तो फार बलवान असावा, असें पहाणारास वाटल्या वांचून रहात नसे. त्याच्याजवळ येतांच, नरेंद्रानें कर्कश स्वरानें त्याला विचारिलें– “ काय, आपल्याला आमचें शौर्य पाहावयाची इच्छा आहे ? ”

काळा पोशाख केलेल्या योध्यानें त्याच्या प्रश्नाचें उत्तर न देतां फक्त आपल्या दोहों हातांतील दोन काठ्या दाखवून ह्मटलें—‘ ह्यांतून कोणतीही एक काठी घे ”

नरेंद्रानें काठी घेतली व दोघेही आपापल्या घोड्यांवरून उतरून परस्पर युद्ध (काठ्यांचें) करूं लागले. कांहीं वेळपर्यंत जयापजयासंबंधानें कोणासच कांहीं वाटलें नाहीं पण थोड्याच वेळांत नरेंद्र हरला. त्या वृद्ध वीराच्या तडाख्यानें नरेंद्राची ढाल चकनाचूर होऊन त्याच्या हातांतील काठी खालीं पडली. नरेंद्रही

मूर्च्छित होऊन पडला. सभोंवतालचे योद्धे पोट धरधरून हंसूं लागले. ह्यामुळें नरेंद्र अगदीं खजिल झाला व त्यानें आपली तलवार बाहेर काढिली. तेव्हां काळा पोशाख केलेला योद्धा हंसत हंसत नरेंद्रास ह्मणाला—" माझ्या हातांत केवळ काठी असतां तूं तलवार चालवावीस, हें न्यायदृष्टीनें चांगलें नाहीं. बायकांचीं व बंगाल्यांचीं सर्व कृत्यें अशींच असतात ! "

ही व्यंगोक्ति नरेंद्रास फार झोंबली व तो दांत ओंठ खात ह्मणाला—बस्, आतां जास्त बोलावयाचें काम नाहीं. तुह्मीही आपली तलवार काढा. "

योद्धा ह्मणाला—" अजून तुझें पोरपण गेलें नाहीं. उगीच कशाला जीव देतोस ? नुसत्या काठीनेंच लढ. तुला तेंच योग्य आहे ! "

योध्याचें वरील बोलणें नरेंद्रास सहन झालें नाहीं; तो आपली तरवार काढून त्यावर तुटून पडला. तें पाहून योध्यानेंही आपली तीन हात लांबीची तरवार बाहेर काढिली. सूर्याच्या प्रकाशांत तलवार चमचम करूं लागली व युद्ध आरंभ झालें. पण हें युद्ध लवकरच बंद झालें काळा पोशाख केलेल्या योध्यानें एकाच हातास नरेंद्राच्या तलवारीचे तुकडे तुकडे केले आणि दुसऱ्यानें त्यानें तलवार उचलली, तेव्हां नरेंद्रानें आपल्या जीविताची आशा सोडली. इतक्यांत एके बाजूनें कोणी चीत्कार

केल्यामुळें योध्यानें तिकडे पाहून आपली तरवार म्यानांत घातली. नरेंद्रास ह्यामुळें आश्चर्य वाटलें व तो ह्याचें कारण काय असावें ह्मणून मागें पाहूं लागला, तों त्याचा अनुचर यवनबालक ह्यानें चीत्कार केला असून त्यामुळें आपले प्राण वांचले, असें त्याला समजलें. पण ह्या वेड्या पोराच्या चीत्कारामुळें, मला मारण्यास तरवार उगारली असतांही हा योद्धा मागें कां सरला, हें त्याला समजेना. तो त्या योध्याकडे पाहूं लागला, पण तो शांत वृत्तीनें गंभीर भाव धारण करून उभा असलेला त्याला दिसला.

तें पाहून नरेंद्र कर्कश स्वरानें त्याला ह्मणाला— " रजपूत वीरा, मी तुजजवळ प्राण भिक्षा मागत नाहीं. तुला जें योग्य वाटेल तें कर. मी तुझ्या उपकाराचें ओझें घेऊं इच्छित नाहीं. "

काळा पोशाख केलेल्या योध्यानें गंभीर स्वरानें उत्तर दिलें–" खरोखर सांगतों, तूं वीर आहेस, हें माझ्या प्रत्ययास आलें. उगीच जास्त कसून पहाण्यांत अर्थ नाहीं. तुझें शौर्य पाहून मी फार आनंदीत झालों आहें. मीही योद्धा आहें. योध्यानें योध्याजवळ भिक्षा मागण्यांत त्याचा कोणत्याही प्रकारें अपमान नाहीं. तूं जरी मजजवळ भिक्षा मागण्यास अनमान करतोस, तरी मला ती मागण्यास मुळींच हरकत वाटत नाहीं. तीन दिवसांनीं मी तुझी भेट घेऊन एका गोष्टीची भिक्षा मागेन. माझें नांव शैलेश्वर. "

नरेंद्र कांहीं उत्तर देणार, त्याच्या अगोदरच शैलेश्वर निघून गेला. त्यामुळें त्याला फार विस्मय वाटून त्यानें त्या यवन बालकास हांक मारिली व "येथें तूं कधीं आलास ? कां आलास ? काळा पोषाख केलेल्या योद्ध्याशीं तुझी पूर्वीची ओळख आहेकाय ? मजवर तरवार उगारली असतां तुझ्या किंकाळीमुळें त्यानें ती म्यानांत कां घातली ?" इत्यादि प्रश्न केले. पण यवनबालक निस्तब्ध ! तो आपल्या प्रश्नांचीं कांहींच उत्तरें देत नाहीं, हें पाहून , त्याला आतां विचारणें व्यर्थ समजून नरेंद्रानें हळुहळु घराचा मार्ग धरिला.

प्रकरण बेत्तिसावें.

देवमंदिर.

For the young warrior, welcome ! thou hast yet
Some tasks to learn same frailties to forget.

'Moore'

राजस्थानांतील नवीन नवीन आचार व विचार पाहून नरेंद्राचें मन कांहीं दिवसपर्यंत स्थिर होतें. पण दगडावर कोरलेला लेख जसा अग्नीनें किंवा पाण्यानें नाहींसा होत नाहीं, तद्वत त्याच्या हृदयावर उमटलेला हेमलतेचा ठसा अजून जशाचा तसा कायम होता.

कोठें बंगाल व कोठें उदेपुर ! दोहोंत शेंकडो कोशाचें अंतर! किती पर्वत, किती नद्या व किती मैदानें ओलांडून, नरेंद्र हिंदुस्थानच्या त्या टोकाहून ह्या टोंकास आला होता; पण प्रभात होतांच पूर्व दिशेस सूर्यबिंबाची आरक्तता पहातांच त्याला त्याच्या प्रेममूर्तीची सौंदर्यछटा आठवल्यावांचून रहत नसे. गंभीर रात्रीचे वेळीं अंध:कारांत गच्चीवरून एकटा फिरत असतां आकाशांतील ताऱ्यांकडे तो पाही, तेव्हां त्याला वाटे कीं ताऱ्यांच्या रूपानें ही माझी प्रणयप्रतिमा हेमलताच मजकडे प्रेमदृष्टीनें पहात आहे ! कोठें वीरनगरांतील वाडा, कोठें जन्हुतनया भागीरथी व कोठें नरेंद्र ! कांहीं ठिकाणा ? पण वाचक ! स्वदेशांतून पळाल्यानें कांहीं चिंतेपासून पळणें होत नाहीं ! कोठेंही जा, तिला वाटलें कीं, ती आपली दत्त ह्मणून पुढें पुढेंच. नरेंद्राला हेमलतेची आठवण येऊन, मृत्युपूर्वी एकदां तरी तिची भेट कशी होईल, असें त्याला वाटूं लागलें. रात्रंदिवस त्याला हीच चिंता होती.

एकदां त्यानें यवनबालकाकडून (बालज्योतिषाकडून) असें ऐकिलें कीं " भगवान एकलिंगेश्वराच्या देवालयांतील कित्येक गोस्वामी भूतभविष्य सांगत असतात. " ह्मणून एके दिवशीं तो त्या मंदिराकडे गेला. त्या वेळीं रात्र सरासरी दोनप्रहरें उलटून गेली असून, आकाश मेघांनीं व्याप्त झालें होतें. व अंगास झोंबणारा गार वारा मधून

मधून वहात होता. भगवान एक लिंगेश्वराचें देऊळ एका पर्वताचे दऱ्यांत असून, तेथून अंधारांत कोणत्याही दिशेस पाहिलें तरी अंधःकारानें व्यापलेल्या अनंत आकाशास टेकलेल्या पर्वताखेरीज कांहीं दिसत नव्हतें. तो देखावा पाहून, जणुकाय प्रकृतीनें अंल्लंघनीय अशा भयंकर पर्वतांची भिंत घालून, तिजवर दूर दिसणारे काळेकुट्ट मेघ ह्यांचा चांदवा देऊन भयंकर रुद्राच्या रहाण्यायोग्य घरच निर्माण केलें आहे कीं काय, असें वाटे. मधून मधून आकाशांत विद्युल्लता चमकत असल्यामुळें आसमंतात् भागांतील पदार्थ किंचित् दृष्टीस पडत होते. आकाशांस विदीर्ण करूं पहाणारीं उंच पर्वतश्रृंगें ऊर्ध्वबाहु मुनीप्रमाणें दिसत होतीं. जवळच एक आंबराई असून पर्वतावरील पाण्याचे लहान लहान ओहोळ बाजूनें वहात होते. वाऱ्याचा सोंसाटा व ओहोळांची कलकल चालूंच होती. अशावेळीं मेघांचा गडगडाट व विजेचा कडकडाट देखील सर्व मृष्टि कंपायमान करून सोडण्यास कमी करीत नव्हता ! सारांश, सर्व जग ह्यावेळीं रुद्रतेजानें एकमय झालें होतें. अशावेळीं, नरेंद्र एकलिंगेश्वराच्या देवळाजवळ उभा राहून प्रकृतीची भयंकर शोभा पहात होता. ह्यावेळी त्याचें हृदय शांत असून त्याला कोणतीही चिंता नव्हती. तो शांत दृष्टीनें ती भयंकर विद्युतशोभा पहात व अकंपित हृदयानें वज्रनादासही एकिकडे सारणारा मेघनाद ऐकत उभा होता. जणुकाय,

प्रकृतीचा उद्वेग पाहून त्यावेळीं त्याच्या मनाचा उद्वेग किंचित् कमीच होत होता !

ऐन मध्यरात्रींचेवेळीं नरेंद्र त्या देवालयांत शिरला. सभामंडपांतून पलिकडे गेल्यावर समोरच एक मला जंगी पितळेचा नंदी होता. त्याच्यासमोर मुख्य देवालय असून त्यांत भगवान एकलिंगेश्वराची मूर्ति शोभत होती. जवळच एक दीर्घकाय, तेजस्वी जटाधारी गोस्वामी ध्यान धारणा करीत बसला होता. त्यानें शुभ्र चंदनाचा अर्धचंद्राकृति तिलक लाविला असून त्याच्या स्कंधावर यज्ञोपवित शोभत होतें. वादळ असल्यामुळें यात्रेकरू मुळींच नव्हते ह्मटलें तरी चालेल. फक्त नेहमींचे सेवेकरी व गोस्वामीचे दोघे चौघे शिष्य एवढीच मंडळी देवळांत होती. ह्या मंदिरांतील मुख्य गोस्वामी चिरकाल अविवाहित राहून आपल्या मरणोत्तर आपली गादी आपल्या मुख्य शिष्यास देई. देवालयाच्या खर्चाप्रीत्यर्थ्य राजांकडून पुष्कळसे गांव मिळाल्यामुळें त्यांच्या उत्पन्नांतून सारा खर्च चाले. ह्याशिवाय यात्रेकरू कडूनही बरीच द्रव्यप्राप्ति होत असे. असो.

अर्ध रात्र लोटल्यावर देवालयांतील एके बाजूस अर्धरात्रीची सूचक घांट वाजली. त्याबरोबर ध्यानस्थ असलेल्या गोस्वामीनें आपलें ध्यान विसर्जन केलें व कांहीं खूण केली. त्यामुळें सर्व मंदिर बमूबम्, हरहर शब्दांनीं गजबजून जाऊन सर्व साहित्यानिशी भोलानाथाच्या

स्तुतीस आरंभ झाला. वेश्या व गवईलोक आपापल्या मधुर आलापानें भोळ्या महादेवास प्रसन्न करण्यासाठीं त्याच्या स्तुतीपर गीत गाऊं लागले. वायु ह्या वेळीं वहात असून जैणुकाय आपल्या भीषण स्वरानें त्या महागीताचा प्रसार करावा ह्मणून मधून मधून वज्रनादही करीत होता. थोड्याच वेळानें गाणें बंद झालें. गोस्वामीच्या सूचनेवरून वेश्या व गवई आपापल्या घरीं निघून गेले आणि देवालयामधलें एकुणएक दीप मालवून टाकिले. ह्याप्रमाणें पूजा समाप्त झाली. नरेंद्र त्या अंधःकारांत कर्तव्यविमूख होऊन उभा होता. थोड्या वेळानें, तशा अंधःकारांतच वर सांगितलेला दीर्घकाय गोस्वामी, आपल्याला हाताच्या खुणेनें बोलावीत असल्याचा नरेंद्रास भास झाला; ह्मणून त्यानें त्याच्याकडे जाऊन विचारिलें—" महाराज, आपणच या देवालयांतील गोस्वामी आहांत का ? "

गोस्वामी कांहीं न बोलतां खुणेनें त्याला ' चूप रहा ' म्हणाला. " आपणाला माझ्याशीं बोलावयाचें आहे काय ? " नरेंद्र म्हणाला. गोस्वामीनें पुन्हां ' चूप रहा ' म्हणून खुण केली.

अंधःकारांत हा चमत्कारिक मौन धारण करणारा पुरुष पाहून विस्मित होत्साता नरेंद्र म्हणाला—" तर मग आपण मला बोलाविलें कशाकरितां ? "

गोस्वामीनें अंगुलीनिर्देश करून त्यास दूर अस-

त्येनें एक स्थान दाखविलें. नरेंद्र तिकडे पाहूं लागला. पण नुसत्या अंधःकारावांचून त्याला कांहीं दिसेना. क्षणेक पाहिल्यावर त्याला तिकडे थोडा प्रकाश दिसूं लागला. गोस्वामीनें नरेंद्रास तिकडे चालण्याचा इशारा केला व आपण पुढें चालूं लागला. दोघेही तशा अंधारांत बरेंच दूर आले. ह्यावेळीं पाऊस अगदीं मुसळधार पडत असून मेघही राहून राहून गर्जना करीत होते. रस्ता जनशून्य व भयानक दिसत होता. ह्या अंधारांत हा मौनावलंबी योगी पुरुष कोण असावा, ह्याचा उद्देश काय असावा ! नरबली देऊन पूजा साधन करणाऱ्या शाक्तांपैकीं तर हा बलिष्ट साधू नसेल ! इत्यादि हजारो कल्पना येऊन नरेंद्र थोडा थांबला. पण पुन्हां " ह्या शांत योगीराजाबरोबर जाण्याइतकेंही धैर्य मजमध्यें नाहीं ? " अशा विचारानें तो पुन्हां त्या गोस्वामीबरोबर चालूं लागला. फार लांब गेल्यावर गोस्वामीनें एका पर्वतामधील गूहेंत प्रवेश केला. नरेंद्रही त्याच्या मागेंच होता. गूहेंत गेल्यावर त्यानें जें कांहीं पाहिलें, त्यामुळें तर त्याला अधिकच नवल वाटलें. गूहेच्या समोरील भागांत देवीची एक भयंकर मूर्ति असून तिजसमोर कांहीं लांकडें जळत होतीं. त्यांचा प्रकाश चोहोंकडे पसरला होता. गूहेच्यावरील भागांतून पाण्याचा एक एक थेंब पडत होता. आगटी जवळ पोथ्या व रक्तानें माखलेली एक तरवार

पडली असून जागोजागीं रक्ताचे थेंब पडले होते. आणि गुहेंतच दूर अंतरावर एखाद्या जलप्रवाहाच्या शब्दासारखा शब्द होत होता.

अशा त्या भयंकर गूहेंत पोंचल्यावर आगटीच्या प्रकाशांत नरेंद्रानें त्या गोस्वामीकडे पाहिलें, तों त्याला त्याची अपूर्व आकृति दिसली. शुभ्र दाढी वक्षस्थलावर पसरली असून मस्तकावरील शुभ्र जटाभार पाठीवर लोंबत होता. शरीर अत्यंत बलिष्ट व उन्नत. अंगकांति तेजस्वी. डोळे पाणीदार व विशाळ. भालप्रदेश विस्तिर्ण असून त्यावर अर्धचंद्राकृति चंदनरेखेनें अपूर्व शोभा दिसत होती. नरेंद्रानें अशी ही अपूर्वमूर्त्ति प्रथमच पाहिली होती.

गोस्वामीनें आपल्या पदाघातानें जळत असलेल्या लांकडाची ज्वाळा विझवून खालीं पडलेली तरवार हातानें उचलून घेतली. जळत असलेलीं लांकडें विझवीत असतांना त्यांतून उडालेल्या ठिणग्यांच्या प्रकाशांत गोस्वामीचे पुष्ट अवयव व त्याचें मुखमंडळ फार भयंकर दिसत होतें. ह्यामुळें नरेंद्र अंमळ चरकून एक पाऊल मागें सरकला व मेणांतून तरवार काढून एका दगडाच्या टेक्यानें उभा राहिला. ह्यावेळीं तो फार धैर्य धरून उभा होता. पण तें धैर्य वर वर मात्र होतें. त्याची छाती भीतीनें उडत होती ! इतक्यांत गोस्वामीनें अति गंभीर स्वरानें

" नरेंद्रनाथ " म्हणून त्याला हाक मारिली. पूर्वीची ओळख नसतां गोस्वामीनें आपलें नांव असें बिनचुक कसें घतलें, ह्याचा नरेंद्राला फार विस्मय वाटून तो त्याजकडे निरखून पहातो तों, तो गोस्वामी दुसरा कोणी नसून उदेपूरच्या रणांगणांत भेटलेला काळ्या पोषाखाचा योद्धा शैलेश्वर आहे, असें त्यानें ओळखिलें.

प्रकरण तेविसावें.

गुहा.

Thy fatal flame.
Is nursed in silence sorrow shame,
A passion without hope or pleasure
In thy soul's darkness buried deep,
It lies like some ill gotten treasure.
Some idol withont shine or name,
O'er which its pale eyed votories keep unholy
Watch while others sleep.

'Moore'.

ह्या अपरिचित योग्याला माझें नांव कसें ठाऊक झालें व ह्यानें मला ह्या भयंकर जागेंत आणून दरडावून मला कां हाक मारिली ! इत्यादि प्रश्न त्याचे मनांत येऊन त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें. एवढेंच नव्हे, तर त्याला थोडी

चिंताही उत्पन्न झाली. पण ती वेळ चिंता करीत बसण्याची नव्हती. इतक्यांत शैलेश्वर त्याला ह्मणाला"–नरेंद्र नाथ ! भगवान एकलिंगेश्वराची सेवा करणारे आम्ही गोस्वामी लोक योगबलानें मनुष्याच्या मनांतला गुप्त हेतूही जाणूं शकतों, समजलास. तूं पापेच्छेनें आमच्या देवालयांत आला होतास !"

नरेंद्र खालीं मान घालून स्वस्थ उभा होता. तें पाहून शैलेश्वर कर्कश स्वरानें पुन्हां ह्मणाला–"असा स्तब्ध कां राहिला आहेस ? आपल्या पापी वाणीनें आपली सगळी पापकथा सांग. म्हणजे त्या पापाच्या प्रायश्चितासाठीं आतांच तुला स्वर्ग दाखवितों. थांब."

शैलेश्वराचें हें बोलणें ऐकून नरेंद्र पहिल्यानें घाबरला. पण स्वाभाविकपणें तो धैर्यवान असल्यामुळें त्यानें धिटाईनें उत्तर दिलें–" तुह्मी कोण आहांत, तें मला ठाऊक नाहीं, तेव्हां तुमच्या प्रश्नाचें उत्तर तरी मीं काय ह्मणून द्यावें ? आणि तुम्हाला तें विचारण्याचा अधिकार तरी काय आहे ?"

" मी एकलिंगेश्वराच्या देवळांतील गोस्वामी आहें आणि मंदिर कलुषित करणाऱ्या व्यक्तींना पाहिजे तें विचारण्याचा मला पूर्ण अधिकार आहे." शैलेश्वर ह्मणाला.

" तुह्मी पाहिजे तेथले गोस्वामी असा, पण मी तुह्माला हेंच उत्तर देतों कीं गोस्वामी लोक स्त्रीप्रेमाला

आंचवले असले, ह्मणून इतरानींही तसेंच व्हावें, हें न्याय्य आहे काय? स्त्रीप्रेमाची इच्छा धरणें हें कांहीं पाप नव्हे!" नरेंद्र म्हणाला.

"नरेंद्रा! उगीच खोटें बोलूं नकोस. तूं स्त्रीप्रेमाकांक्षी नसून परस्त्रीअभिलाषी आहेस! पाप्या, तुझ्या ह्या पापाबद्दल दंड द्यावयास ह्या जगांत कठिणतर दंड नाहीं किंवा नरकांत अशी जागाही नाहीं कीं जेथें तुझ्या ह्या पापाचें प्रायश्चित तुला मिळेल." शैलेश्वर भीषण स्वरानें ह्मणाला.

नरेंद्र खालीं मान घालून गोस्वामी आणखी काय म्हणतो त्याची वाट पहात होता. तेव्हां शैलेश्वर पुन्हां त्यास उद्देशून म्हणूं लागला—

"नरेंद्रनाथ! असा भूलून जाऊं नकोस. ज्या घोर पापांत तूं लिप्त झाला आहेस, त्याचा विचार कर. बिचारा सरळचित्त श्रीश्चंद्र आणि पवित्र हेमलता यांच्या संसाराची धूळधाणी करावी, असाच ना तुझा विचार? जी कमलमुखी बालिका लहानपणीं तुजबरोबर प्रीतीनें खेळत असे, व आतांसुद्धां तुजवर भावाप्रमाणें प्रीति करून रात्रंदिवस तुझ्यासाठीं झुरत आहे, ती तुझी होऊन कुंलटेप्रमाणें तिनें तुझी सेवा करावी, असाच ना तुझा विचार? बोल? पापिष्टा, तुझी ती इच्छा जागच्या जागींच जिरून हें जग तुला शून्यवत होईल, समजलास.

तूं कदाचित् हा विचार केला नसशील आणि म्हणूनच ह्याचा परिणाम असा भयंकर होईल, हेंही तुला ठाऊक नसेल. पण मी खरेंच सांगतों, नरेंद्रनाथ! परिणाम असाच–असाच व्हावयाचा."

नरेंद्र अधोवदनानें सारें ऐकत उभा होता. शैलेश्वराचें बोलणें संपलें तरी त्याचा तो वज्रध्वनि अजून पर्यंत नरेंद्राच्या कानांत घुमत असून त्याचें शरीर कांपत होतें व डोळ्यांवाटे अश्रुप्रवाह चालला होता. कांहीं वेळानें त्याचा हा भाव पालटून हळुहळु तो बोलूं लागला—

"योगीराज, तुमच्याबरोबर ह्या गुहेंत येतेवेळीं आत्मरक्षणा करितां मीं ही तरवार आणिली होती, ती घ्या आणि ह्या घोर पाप्याचें मस्तक छेदून जळत असलेल्या ह्या अग्नींत तें टाकून द्या. ह्याशिवाय ह्याला दुसरें प्रायश्चितच नाहीं!"

हें ऐकून शैलेश्वर शांततेनें म्हणाला–"वत्सा, ह्या जगांत जसें प्रत्येक रोगावर औषध आहे, त्याचप्रमाणें प्रत्येक पापावर प्रायश्चितही आहे. तुझा नाश करावा अशी माझी इच्छा नसून तुझ्या बऱ्याची इच्छा आहे."

"महाराज, मी एवढ्या दयेस पात्र नाहीं. हेमलते–सारख्या पवित्र बालिकेस कलुषित करूं पहाणारा जो मी, त्या मला हीच शिक्षा योग्य आहे." नरेंद्र सद्गद स्वरानें बोलला.

" नरेंद्रा ! तूं समजतोस इतका तूं पापी नाहींस. मला सर्व ठाऊक आहे. तुझी इच्छा, हेमलतेला एकदां तरी पहावें अशी असून ती साध्य होईल कीं नाहीं, हें विचारण्यासाठींच तूं एकलिंगेश्वराच्या देवालयांत आला होतास. खरेंना ? " शैलेश्वर ह्मणाला.

शैलेश्वरानें योगबलानें मनांतली गोष्ट जाणली, हें पाहून नरेंद्र फार विस्मित होत्साता शांत चित्तानें ह्मणाला—प्रभो, हेमलतेच्या नाशाची तर गोष्टच नको, पण तिच्या पायांत जर नुसता कांटाही रुतला असेल, तर त्याकरितां सुद्धां मी माझा प्राण देण्यास सिद्ध आहें. खरें कीं खोटें, हें सर्वांतर्यामी भगवान जाणत असेल. "

" तर मग तिच्या हृदयोद्यानांत तूं जो कंटक रोविला आहेस, तो काढून टाकण्याचा उद्योग कां करीत नाहींस ?" शैलेश्वर ह्मणाला.

" मी ? " नरेंद्र ह्मणाला.

" होय, तूंच ! बालपणांत तूंच तिच्या हृदयोद्यानांत प्रेमकंटक रोविला आहेस. तो तुजवांचून दुसऱ्या कोणाच्यांनेही काढवणार नाहीं. त्याला तूं काढ. नाहींतर बिचारी हेमलता जिवंत असून मेल्यासारखी होईल. तिचा पति सच्चरित्र व धर्मपरायण असून संसारांत दक्ष आहे. पण हेमलता; तूं कोठें आहेस, काय करितोस ह्या काळजीनें रात्रंदिवस झुरत असल्यामुळें तिचें लक्ष त्याच्याकडे

नाहीं. अर्थातच तो तिला विश्वासघातिणी समजंत आहे. ह्मणून तूं आधीं तिच्या चितेचें मूळ खुडून टाक. " शैलेश्वर ह्मणाला.

" कोणत्या रीतीनें ? मी तिच्या दृष्टीसमोर राहिल्यानें ती चिंता दूर होईलका ? " नरेंद्र ह्मणाला.

" हो, होईल कदाचित्. पण असें केल्यानें तुझ्याप्रमाणें तिचेंही मन उत्कंठित होण्याचा संभव आहे. " शैलेश्वर ह्मणाला.

" तर मग दुसरा उपाय सांगा. मी दूर राहिलों तर माझी चिंता वाढेल आणि जवळ गेलों तर तिची उत्कंठा वाढेल ! एकुण उपायच नाहींना ?" नरेंद्र ह्मणाला.

" उपाय कसा नाहीं ? ऐक. तिच्या दृष्टीसमोर राहूनही तिच्याशीं जन्माची ताटातूट केली पाहिजे. जर खरोखरच तुझी तिजवर प्रीति आहे, आणि तिच्या बऱ्याकरितां आपला प्राण द्यावयासही तूं कबूल आहेस, तर मी सांगतों तें ऐक. ह्मणजे, तूं आपल्या धर्माचा त्याग करून मुसलमान हो आणि एखाद्या मुसलमानाच्या मुलीबरोबर विवाह करून बंगालच्या सुभेदाराची नौकरी कर. असें झालें ह्मणजे हेमलतेला हें समजेल. आणि मग हळुहळु तिच्या मनाचा भाव बदलेलच बदलेल. नरेंद्रा, मनुष्याचें मन शुष्क काष्ठाप्रमाणें कठिण नसून तें लताप्रमाणें कोमल असतें. हेमलतेला जेव्हां हें समजेल कीं,

ज्यानें माझ्या मनास वेडें करून सोडलें असून ज्याची मी रात्रंदिवस चिंता करित्ये; त्याची आशा, त्याचें प्रेम आणि त्याचा उद्देश निराळ्याच वस्तूवर आहे, तेव्हां खरोखरच तिच्या मनाचा भाव बदलेल कीं नाहीं, ह्याचा विचार कर. नरेंद्रा! बाबा तुझ्या चमत्कारिक पापाचें हेंच चमत्कारिक प्रायश्चित आहे!" शैलेश्वर म्हणाला.

शैलेश्वराचें भाषण ऐकून नरेंद्राच्या डोक्यावर विद्युत्पात झाल्यासारखें झालें. तो कांहीं वेळपर्यंत स्तब्ध राहिल्यावर हळुहळु बोलूं लागला—" भगवन्, माफ करा. ह्या चमत्कारिक प्रायश्चित्तासही मी तयार नाहीं. आपण म्हणाल तर समुद्रांत उडी टाकीन, अग्नींत जळून मरेन. पण योगीराज, अन्यकन्या—तशांत—यवनकन्या तर मी मुळींच अंगिकार करणार नाहीं."

" स्वार्थपरायणा! तूं अग्नींत उडी टाकिलीस तर तुला इजा होऊन तूं मरशील; पण, तूं तिजकरितां अग्नींत उडी टाकून मेलास" हें ऐकून हेमलतेचें हृदय तुझ्या शोकानें फाटून जाईल व ती चिरकालिक अभागिणी होईल! याचा कांहीं तरी तूं विचार केला आहेस?, नरेंद्रा! असाचकां तूं तिच्या बऱ्याकरितां प्राण देणार होतास? " शैलेश्वर म्हणाला."

" मी तिच्याकरितां पाहिजे तें सहन करण्यास सिद्ध आहें कीं नाहीं, हें त्या परमेश्वरास ठाऊक. पण

योगीराज, आपण योजिलेला उपाय असह्य आहे. ही तिखट औषधी सोडून एखादी दुसरी सौम्य औषधी सांगा." नरेंद्र म्हणाला.

" बाबारे, सौम्य रोगास, सौम्य व भयंकर रोगास भयंकरच औषध पाहिजे " शैलेश्वर ह्मणाला.

" पण योगीराज, आपण परम पावन शैव असून मला ' मुसलमान हो ' ह्मणून उपदेश करिता, हें कसें ?" नरेंद्र म्हणाला.

" नरेंद्रा ! मनुष्याला पापामुळें पशूचा देखिल जन्म घ्यावा लागतो; असें असतां, तूं केवळ जातिभ्रष्ट होण्यासाठींच भीत आहेस ? " शैलेश्वर ह्मणाला.

ह्यावर नरेंद्र कांहीं न बोलतां डोक्यावर हात ठेवून विचार करीत उभा राहिला व शैलेश्वरही विशेष कांहीं न विचारितां गुहेंत इकडून तिकडे फिरूं लागला. थोडा वेळ निघून गेल्यावर शैलेश्वर गंभीर स्वरानें म्हणाला-" नरेंद्रा ! माझ्यावर विश्वास ठेव."

नरेंद्र ह्मणाला—" योगीराज, विश्वास जर नसता, तर मीं माझें शस्त्र आपणाजवळ कसें दिलें असतें ?"

शैलेश्वर ह्मणाला—" बरें तर ऐक. ह्या जगांत स्त्रियांचें मात्र जीवन एक प्रेम. पुरुषांचें नव्हे. त्यांच्यामागें अनेक आशा, अनेक अभिलाष व अनेक उद्देश असतात. तूं तरूण, साहसी व अभिमानी आहेस, आपळी तरवार

चालवून कीर्ति मिळीव. प्रेम प्रेम ह्मणून असा बायकोप्रमाणें रडत कां दिवस घालवितोस ? तुझा बंगाल देश वीरहीन व यशहीन आहे, तेथें जाऊन आपल्या यशाचा झेंडा उभार व स्वदेशाचा गौरव वाढीव. ह्मणजे, वज्रपाणि पुरंदर व शूलपाणि महादेव हे तुझी मनकामना पूर्ण करितील. एवढेंच नव्हे, तर सर्वत्र संचार करणारा वायूही जगतीतलावर तुझ्या यशाचें गायन करील." इतकें बोलून शैलेश्वर स्तब्ध झाला. नरेंद्र टक लावून त्याजकडे पहात होता. पूर्वी त्याला त्याचें युद्धनैपुण्य दिसलेंच होतें; आज दुसऱ्याचें हृद्गत जाणण्याचेंही त्यांत सामर्थ्य आहे, असें त्याच्या लक्षांत आलें.

शैलेश पुन्हां म्हणाला—" नरेंद्रा, हा भयंकर नाद ऐक. त्याचप्रमाणें हें भयंकर वादळही पहा ! वारा तरी किती जोरानें वहात आहे ! अशा भयंकर रात्रीं, तूं एकलिंगेश्वराच्या मंदिरांत दर्शनास आलास ! पण तें दर्शन कोणत्या उद्देशानें ? स्वदेशाचें हित साधण्याकरितां ? कीं आणखी कशा करितां ?

नरेंद्रा ! तुला धिक्कार असो. शतवार धिक्कार असो. तुझ्यासारख्या वीर पुरुषानें एका रमणीमुखदर्शनाकरितां आपल्या आयुष्याचा मुख्य उद्देश भुलून स्वकर्तव्यपराङ्मुख व्हावें, हें नीट नाहीं. प्रेमचिंता दूर कर. अथवा, ती जर दूर होत नसली; तर अशा तरी सुंदरीच्या

प्रेमपाशांत बद्ध हो कीं जिच्या साहचर्यानें जन्मास आ-ल्याचें सार्थक होईल ! पुरुषसिंहा, सिंहिणीस ग्रहण कर."

" पण अशी स्त्री कुठें मिळणार ? " नरेंद्र म्ह-णाला. " ह्या जगांत मिळेल ! थोडा शोध मात्र कर. जी प्राणापेक्षांही तुजवर प्रीति करील, सावित्रीप्रमाणें तुझी सेवा करील, युद्धाचे वेळीं नरमुंडमाला धारण करणाऱ्या आदिशक्तीप्रमाणें हातांत खड्ग घेऊन तुझ्याजवळ उभी राहील. निवांत वेळीं प्रेमजलानें तुला स्नान घालील व विपत्समयीं यशगायनानें तुला रोमांचित करील; अशी स्त्री मिळाली तर खुशाल तिचें ग्रहण कर " शैलेश म्हणाला.

" पण अशी स्त्री ह्या जगांत तरी असेल का ? " नरेंद्र म्हणाला.

" नरेंद्रा, माझें योगबल कसें आहे हें तूं जाणतोच आहेस. जर अशी स्त्री ह्या पृथ्वीवर नसती, तर मीं तुला ह्या गुहेंत कां म्हणून बोलाविलें असतें ? जिच्याविषयीं मी बोलत आहें ती हेमलतेपेक्षांही तुजवर जास्त प्रीति करिते. नरेंद्रा ! फार काय सांगूं, माझें एवढें वय झालें--काळ्या केसांना सफेदी आली, पण स्त्रीच्या हृदयांत इतकें गंभीर प्रेम असतें, याची कल्पनाही मला नव्हती ! त्या स्त्रिये-ला तूं पूर्वीं पाहिलें आहेस. " शैलेश म्हणाला.

" मला तर कांहीं आठवण नाहीं. " नरेंद्र--म्हणाला.

" आठवत नाहीं ! बरें तर, आज ती तुला स्वप्नांत दिसेल, ह्मणजे तूं तिला प्रत्यक्ष ओळखच. मी आतां जातों. ह्या पात्रांत देवीचें तीर्थ (मद्य) आहे, तें पिऊन ह्या गूहेंत तूं ह्या विझत असलेल्या मंद अग्नी-प्रकाशाकडे पहात नीज. जेव्हां हीं जळत असलेलीं लांकडें पूर्तीं जळून जातील, तेव्हां तुला स्वप्न दिसेल. स्वप्नांतील स्त्री तुजवर पूर्णपणें अनुरक्त आहे. एवढेंच नव्हे, तर ती तुजप्रमाणेंच पूर्ण अभिमानिणी आणि शूर आहे. वीरपुरुषा, खरोखरच ती वीरनारी तुला योग्य आहे. " शैलेश्वर ह्मणाला.

" आपल्या ह्या भाषणाचें मला फार आश्चर्य वाटतें " नरेंद्र ह्मणाला.

" ऐक. आणखी एकभयंकर गोष्ट तुला सांगावयाची आहे. स्वप्न पाहिल्यावर उदईक पहाटेस ह्या गूहेंतून उठून बाहेर जा आणि स्वप्नांत पाहिलेल्या स्त्रियेशीं विवाह करतोस कीं नाहीं, याचा निर्णय तीन दिवसांचें आंत कर. विवाह करावयाचा असला, तर पांढऱ्या चंदनाचा तिलक लावून ह्याच गूहेंत आमावास्येच्या रात्रीं मला भेट. ह्मणजे, ती सुंदरी तुला कशी प्राप्त होईल, हें मी तुला पद्धतवार सांगेन. अथवा विवाह करावयाचा तुझा विचार नसला, तर रक्त चंदनाचा तिलक धारण करून त्याच आमावास्येच्या रात्रीं मला इथें भेट. ह्मणजे, नररक्तविलासिनी कालिकेस संतोषित करा-

वधाला मी तुझा बळी देईन. नरेंद्रा ! मी काय बोललों इकडे तुझें लक्ष आहेना ? ही अट कबूल करशील, तरच श्रीकालिका तुला स्वप्न देईल." शैलेश्वर ह्मणाला.

शैलेश्वराचें हें गंभीर भाषण ऐकून नरेंद्राचें हृदय भीतीनें उडूं लागलें. तथापि, 'आपण भ्यालों आहोंत' हें दाखविण्याची त्याला लाज वाटून तो स्थिर चित्तानें ह्मणाला—"भगवन्, आपण बोलला, तें मला कबूल आहे. तीन दिवसांनंतर आमावास्येच्या रात्रीं ह्या गूहेंत मी आपली भेट घेईन."

"शाबास, वीरपुरुषा शाबास ! तीन प्रहर रात्र होऊन गेली, आतां मी जातों" असें ह्मणत शैलेश्वर तेथून निघून गेला.

प्रकरण चोविसावें.

वीणाधारिणी.

Who is the maid ? what means her lay ?

" Scott. "

शैलेश्वर गेल्यावर नरेंद्र त्या अंधकारमय गूहेंत इकडून तिकडे फिरूं लागला. तो परकीय देशांतील एका भयंकर जागेंत अद्भुत साधूच्या कचाट्यांत सांपडला आहे. व त्याच्या सांगण्यावरून तो लहानपणाचा अनुराग व तरुणपणाचा प्रेम ह्यांची परिसमाप्ती करण्यास तयार झाला आहे. न केल्यास त्याला करालवदना कालिकेसमोर हृत्पिंड अर्पण करावा लागेल ! असो.

थोडा वेळपर्यंत तो गूहेंत फिरत होता. इतक्यांत अग्नि मंद होऊं लागला, हें पाहून त्यानें शैलेशाच्या आज्ञेप्रमाणें पात्रांतील मद्य देवीचें तीर्थ समजून तोंडांत ओतिलें. तीर्थाच्या प्रभावामुळें त्याला चक्कर येऊन तो गूहेच्या एका कोंपऱ्यांत, अग्नीकडे पहात पडला. अग्नीची

ज्वाला कधीं मंद व कधीं तेज होत होती. कधीं कधीं, लांकडें जळतांना त्यांतून ठिणग्या निघत होत्या. असें होतां होतां अग्नीची ज्वाळा थंड पडून निखाऱ्यांचा नुसता मंद प्रकाश राहिला. त्या प्रकाशांत गूहेच्या स्वतः-सिद्ध दगडी भिंती मोठ्या चमत्कारिक दिसत होत्या. देवीच्या तीर्थप्रभावानें उन्मत्तप्राय झालेल्या नरेंद्राला त्या भिंतीवरील मंद प्रकाशांत छायेच्या नाना प्रकारच्या आकृति दिसूं लागल्या. करालवदना देवी आपल्या प्रज्वलित नेत्रानें त्याच्याकडे पहात आपला खड्ग जणुकाय त्याच्याकडेच लांबवीत आहे, असें त्याला वाटलें. नरेंद्रानें उठण्याकरितां पुष्कळ धडपड केली. पण तो उठूं शकला नाहीं. किंचित् काळ गेल्यावर अग्नि अगदींच विझला. पण नरेंद्राचें लक्ष तिकडे नव्हतें. शैलेश्वरानें सांगितल्याप्रमाणें नुकताच त्याच्या स्वप्नास आरंभ झाला होता—

गूहेत दूर अंतरावर जलप्रवाहाचा जो शब्द होत होता, त्याऐवजीं आतां नरेंद्राला संगीतध्वनि ऐकूं येऊं लागला व त्या भयंकर अंधारांत प्रकाशाची किंचित् झाक दिसूं लागली. इतक्यांत, गूहेच्या एक्या भिंतींतून सहज एक दगड सरकला व त्यामुळें झालेल्या छिद्रांतून अपूर्व संगीतध्वनि व स्वर्गीय प्रकाश ह्यांचा त्या गूहेंत एकदम समावेश झाला. त्या प्रकाशांत साक्षात् अग्निशिखेप्रमाणें भासणारी एक अपूर्व रूपराशि

षोडशवर्षीय सुंदरी, आपल्या करकमलांत वीणा धारण करून अपूर्व वाद्यध्वनि करीत आहे, असें त्याला दिसलें. अहाहा ! किती तरी हें अपूर्व सौंदर्य ! काय हे उज्वल नेत्र ! हा केशकलाप तरी किती दाट व काळा ! शरीर तरी किती गोंडस ! ही मानवी आहे कीं अप्सरा ? नरेंद्रनाथ ! स्वप्न नीट पहा. हें सुंदर मुखमंडल, हे चारु नेत्र व हे रसरसित ओंठ तूं कोठें तरी पाहिले आहेस.

दुरून ऐकूं येत असलेल्या अस्फुट संगीतध्वनिप्रमाणें नरेंद्राची स्मरणशक्ति हळुहळु त्याच्या मनांत जागृत होऊं लागली. काशीचें युद्ध, दिल्लीमध्यें पाहिलेले स्वप्न आणि तेथेंच पाहिलेली एक यवनसुंदरी, इत्यादि सान्या गोष्टींची त्याला आठवण होऊन " दिल्लींत पाहिलेली पुष्पकलिका ह्या राजस्थानांतील एकांत गृहेंत आज कशी फुलली " याचें त्याला आश्चर्य वाटलें. ती स्वरुपसुंदरा वीणाधारिणी रमणी सप्तस्वरांनीं युक्त असें वीणावादन करून त्याबरोबर गाऊं लागली. नरेंद्र तें ऐकत तिजकडे टक लावून पहात होता. ती गात असतां तिचा गळा दाटून येऊन नेत्रावाटे एक दोन अश्रु आले, पण ते पुसून ती पुन्हां गाऊं लागली.

पद (ज़ेलखानेका दारोगा.)

पतिविण गति नाहीं जगति अबले ॥ धृ० ॥
पतिस्वरुपीं निज रूपा. मिळवी प्रेमदानानें ।

आनंदवि निजपतिला सति ती निमंजुलध्वनिनें ॥
पतिपायापाशिं जींचें लक्ष्यच विकलें ॥ १ ॥
ह्या संसारीं दुःखद्समयीं धैर्य धरी चित्तीं।
प्रेमजलानें आर्द्र करी नित पतिहृदयाला ती ॥
अशी सति रीति गाती सुजन सगळे ॥ २ ॥

याप्रमाणें ती पतिव्रताधर्मास अनुसरून गात असलेलें गाणें संपलें, पण नरेंद्राच्या कानांत त्या गाण्याचा नाद अझूनही चालूच होता. हें मधुर गायन करणारी ही मानव कन्या आहे कीं अप्सरा, ह्याचा कांहींच निश्चय न होऊन तो तिच्या सुंदर मुखाकडे पाहूं लागला. तिचा तोंडवळा पाहून, दिल्लीच्या राजवाड्यांत पाहिलेल्या स्वप्नांतील अप्सरा हीच आहे, अशी त्याची खात्री झाली. पण त्या वेळीं पाहिलेल्या सौंदर्यांत कांहीं तरी फरक झाला असावा, असें त्याला वाटलें. तें सौंदर्य पूर्वींपेक्षां वाढलें होतें, कीं कमी झालें होतें, याचा निश्चय त्याच्यानें झाला नाहीं. मात्र कपाळ फिकें, बाहु व बोटें अंदाजापेक्षां क्षीण, नेत्र दुःखानें व्याप्त असें त्याला दिसलें. बस्, यापेक्षां जास्त निरखून पहाण्याची संधि त्याला मिळाली नाहीं. इतक्यांत गाणें पुन्हां सुरूं झालें. ह्या वेळचें गाणें 'पतिव्रता आपल्या पतीजवळ काय मागते' ह्या विषयास अनुसरून होतें.

पद.

प्रीतिदान द्या । मला प्रीतिदान द्या ।
होउनिया प्रेमलता । चरणिं चिकटलें मी अतां ।
तोडु नका प्रेमपाश । आसराच द्या ॥ १ ॥
जात देश बंधु गोत । त्यजुनि येई ही मी येथ ।
अन्य आस नाहीं मला । टाकुनी न द्या ॥ २ ॥
तव दुःखें दुःखी होई । तव सौख्यें सौख्य देहीं ।
छायेसम फिरत सतत । अंतरा न द्या ॥ ३ ॥

गाणें समाप्त झालें व मेघाच्या छायेनें सूर्यप्रकाश जसा नाहींसा व्हावा, त्याप्रमाणें ती सुंदरी आलेल्या मार्गानें निघून गेली. सरकलेला दगड पुन्हां आपल्या जागीं बसून वाट बंद झाली. वीणाध्वनिही बंद झाला! फक्त, पूर्वीं ऐकूं येत असलेला जलप्रवाहाचा शब्द मात्र ऐकूं येत होता. तो ऐकत, झालेल्या गोष्टीबद्दल विचार करीत नरेंद्र पुन्हां झोंपीं गेला. सूर्योदय होतांच तो जागृत होऊन आपली तरवार सांवरीत गुहेच्या बाहेर आला. त्या वेळीं, बालसूर्याची प्रभा पडल्यामुळें दंवानें सिंचित झालेले वृक्षपल्लव व कोमल तृणांकुर मोठे मजेदार दिसत असून झाडांच्या खांद्यावर बसून पक्षी आनंदानें कोलाहल करीत होते. दुरून दृष्टीस पडत असलेल्या एकलिंगेश्वराच्या देवालयावर दिनमणीची प्रभा पडल्यामुळें तें सुवर्णमंदिराप्रमाणें दिसत असून त्यांत पूजेकरितां लोकांची गर्दी झाली होती.

प्रकरण पंचविसावे.

खड्गधारिणी.

A naked dark gleamed in her hand.

" Scott. "

त्या दिवसापासून नरेंद्राला जी काळजी आणि जी व्यथा होती, ती कांहीं पुसूं नये. शैलेश्वराच्या प्रश्नांस काय उत्तरें द्यावीं हें त्याला सुचेना. तीन दिवस निघून गेले, नेमलेली आमावास्या आली. नरेंद्र, पूर्वी सांगितलेल्या गुहेच्या तोंडाशीं येऊन, मधून मधून आकाशाकडे पहात इकडे तिकडे फिरूं लागला. त्याच्या हातांत तरवार असून, तो ह्या वेळीं फार गंभीर आणि निश्चयी दिसत होता.

थोड्याच वेळानें शैलेश्वर येऊन त्यानें नरेंद्रास आशिर्वाद दिला. नरेंद्राला, त्यास प्रणाम करावयाचेंही मान राहिलें नाहीं.

"निश्चय झाला ?" शैलेश्वरानें नरेंद्रास विचारिलें.

"हो हो !" नरेंद्र गंभिर पण थोड्या कर्कश स्वरानें म्हणाला.

नंतर दोघेही गुहेंत शिरले.

गुहेंत मागल्या वेळेप्रमाणेंच स्वच्छ प्रकाश होता. त्या प्रकाशांत शैलेश्वरानें नरेंद्राकडे पाहिलें, तों त्याचे कपाळ, बाहू व छाती रक्तचंदनानें लेपन केलेली त्याच्या दृष्टीस पडली. व त्यामुळें त्याला फार आश्चर्य वाटून तो नरेंद्रास म्हणाला—

" पापिष्टा ! अझून परस्त्रियेची अभिलाषा तुझ्या मनांत आहेच तर ? "

" छे छे, ती माझ्या मनांत मुळींच नाहीं. " नरेंद्र ह्मणाला.

" तर मग आतां हेमलतेला पहावयाची तुझी इच्छा तर नाहींना ? " शैलेश्वर ह्मणाला.

" नाहीं " नरेंद्र ह्मणाला.

" यवनकन्येबरोबर विवाह करणारना ? शैलेश्वर ह्मणाला.

" तें ह्या जन्मांत होणें नाहीं " नरेंद्र म्हणाला.

" तर मग कबूल केल्याप्रमाणें तरवार खालीं ठेऊन जगदंबेसमोर जीवदान देण्यास सिद्ध हो. " शैलेश्वर क्षणेक निस्तब्ध होऊन बोलला.

" ह्मा गुहेंत तुमच्याशीं भेट घेण्याबद्दल कबुलायत होती, त्याप्रमाणें हा मी येथें आलों आहें. " नरेंद्र ह्मणाला.

" मूर्खा, सिंहाच्या गुहेंत पाय देऊनही जिवंत रहावयाची आशा करितोस ? मी येथें तुझा प्राण घेतों. बघूं बरें, तुला वांचवावयास कोण येतें तें ?" शैलेश्वर ह्मणाला.

" आणखी कोण येणार ? ही माझी तरवार !" असें ह्मणून नरेंद्रानें आपली तलवार बाहेर काढिली.

शैलेश्वरानेंही गुहेंतील एका ठिकाणांतून आपली तरवार काढिली. उदेपुरांतील समरांगणानजिक असलेल्या झऱ्यांतील पाणी घेतांना जसें युद्ध झालें होतें, तसेंच ह्या गुहेंत दोघांचें युद्ध होऊं लागलें. नरेंद्र ह्या वेळीं अधिक सावधपणानें लढत होता, तरी त्याचें कांहीं चालेना. सिंहाप्रमाणें पराक्रमी असलेल्या शैलेश्वरानें थोड्याच अवकाशांत नरेंद्रास हरवून त्याची तरवार हिसकावून घेतली व हास्ययुक्त मुद्रेनें त्याला ह्मणाला—" नुसती पूजा किंवा ध्यानधारणा करण्यांतच हे केश पांढरे झाले नाहींत ! राजस्थानची जमीन ' वीरप्रसविनी ' आहे, तेव्हां लढाईचे वेळीं आपलें शौर्य दाखविण्यांत देखील आह्मी गोस्वामीलोक अग्रगण्य आहोंत, समजलास ? मूर्खा, तुजसारख्या भित्र्या बंगाल्याबरोबर युद्ध करावयाचा कलंक मला लागला, याचीसुद्धां मला लाज वाटते."

" आपल्याला वाटेल तें करा, हा मी तयार आहें " नरेंद्र ह्मणाला.

" असें का ?" असें ह्मणून शैलेश्वरानें नरेंद्राचा

हात इतका आवळून बांधिला कीं त्याच्या शिरा देखील वर स्पष्ट दिसूं लागल्या.

नरेंद्रानें हूं देखील केलें नाहीं. नंतर शैलेश्वरानें पूर्वींप्रमाणेंच देवीच्या तीर्थाचें पात्र त्याजसमोर ठेवून तें त्याला पिण्यास सांगितलें.

नरेंद्रानें तसेंच केलें. नंतर शैलेश्वर गूहेंतून निघून गेला. देवीच्या तीर्थप्रभावानें नरेंद्र बेहोष होऊन जमिनी-वर पडला व त्याच्या डोळ्यांस अंधारी आली. इतक्यांत, त्या गूहेंत कोणीतरी दोन व्यक्ति बोलत आहेत, असा त्या-ला भास झाला. त्या काय बोलतात तें ऐकण्याचा प्रयत्न तो करीत असतां त्याला झोंप येऊन तो अचेतन झाला.

थोड्याच वेळानें नरेंद्राला वाटलें, जणुकाय पहि-ल्या वेळेप्रमाणें आजही त्या अंधारमय गूहेंत उजेडाची छटा पडली असून ती दगडी भिंत सरकली आहे ! मेघ सरकून दूर झाले म्हणजे सूर्याचा जसा प्रकाश पडतो, तद्वत त्या गूहेंत आतां चांगला उजेड झाला व त्या उजे-डांतच एक सुंदर स्त्री दिसूं लागली. पण, ती ह्या वेळीं पूर्वींप्रमाणें गीत गात नव्हती, किंवा वाद्यही वाजवीत न-व्हती. ह्या खेपेस तिच्या हातांत तरवार होती ! किती तरी भयंकर मूर्ति ! डोळ्यांतून जणुकाय अग्निकण बाहेर पडत होते ! निस्तेज पण लाल ओंठ दांतानें दाबले होते ! मुखकमल रागानें लाल ! हातांत शैलेश्वराची लांब तर-

बार व स्तनप्रदेशामध्यें चोळीच्या आंत खोंचलेली एक कटार ! ही भयंकर मूर्त्ति पाहून नरेंद्र फार चकित् झाला. त्याच्या कपाळावर घर्मबिंदु दिसूं लागले ! त्यानें उठण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण स्वप्नांतील विपदापन्न व्यक्तीप्रमाणें पळावयास तर असोच, पण उठण्यासही तो असमर्थ झाला !

ती सुंदरी हातांत तरवार घेऊन गूहेंत आली व अंमळ उभी राहून नरेंद्राकडे वळली. पण इतक्यांत तिच्या हातांतून तरवार खालीं पडली ! पुढें काय करावें, हें तिला सुचेना. इतक्यांत तिनें निश्चयानें छातींतील कटार काढून हातीं घेतली व मजबूत धरून नरेंद्राच्या छातीवर ठेविली ! इतक्यांत पुन्हां तिचा काय निश्चय झाला तें नकळे, पण ह्याही खेपेस तिच्या हातास कंप सुटून कटार जमिनीवर सुटून पडली ! व ती हळुहळु निघून गेली.

नरेंद्राच्यानें आतां धैर्य धरवलें नाहीं. तो मोठ्यानें ओरडून उठून बसला. त्याचे डोळे उघडले. देवीच्या तीर्थाची उन्मत्तता नाहींशीं झाली. सर्व शरीर घामानें चिंब ! ती सुंदर स्त्री निघून गेल्यावर गूहेंत जिकडे तिकडें अंधार पडला होता, ह्मणून नरेंद्र हळुहळु गूहेच्या बाहेर आला.

ह्या वेळीं रात्र नुकतीच सरली होती. पूर्व दिशेकडील आकाश आरक्तच्छटेनें तप्त सुवर्णासारखें दिसत

असून विझत असलेल्या दिव्याप्रमाणें, अजूनही एक दोन नक्षत्रें त्यावर शोभत होतीं. पहाटेचा शितळ वारा, पर्वत व शिवमंदिर ह्यांवरून वहात असून, नूतन उमललेल्या पुष्पांचा सुगंध निद्रेतून नुकतेंच जागें होत असलेल्या जगताला प्रसन्न करीत होता. लता मंडपांतून एक दोन पक्षी सुंदर स्वरानें गात होते. अशा समयीं, नरेंद्र तेथून देवालयाकडे चालता झाला.

प्रकरण सव्विसावें.

शामनगरचें युद्ध.

Like fabled Gods, their mighty war,
Shook realms and nations in its jar.

"Scott."

वरील गोष्टीला कांहीं दिवस लोटून गेल्यावर जोधपुराधिपती यशवंतसिंहानें लढाईची चांगली तयारी करून औरंगजेबाचा सामना करावयास आग्र्यास प्रयाण केलें. नरेंद्रही त्याच्या बरोबरच होता. कांहीं महिनेपर्यंत नरेंद्र उदेपुरास होता, हें मागें सांगितलेंच आहे. इतक्या अवधींत

आग्र्यास राज्यक्रांति होऊन पूर्वींच्या बादशहाच्या हातून राज्यसूत्रें गेलीं होतीं. तो प्रकार आणि त्या राज्यक्रांतीचा इतिहास वाचकांस कळविणें इष्ट आहे. इतिहास वाचणारे वाचक, पाहिजे तर, हें प्रकरण वाचल्याखेरीज पुढील आख्यायिका वाचूं शकतील.

भावा भावांत जुंपलेल्या ह्या भयंकर लढाईस आरंभ होण्यापूर्वी काशीच्या युद्धांत सुलतान सुजा व उज्जनीच्या युद्धांत यशवंतसिंह हरले होते, हें पूर्वी सांगितलेंच आहे. आपल्या तर्फेच्या यशवंतसिंहाचा पराभव झाल्याची वार्ता ऐकून दाराला फार राग आला व तो एक लक्ष सैन्यानिशी तयार होऊन चंबळा नदीच्या किनाऱ्यास तळ देऊन औरंगजेब व मुराद यांची वाट पहात बसला. थोड्याच दिवसांनीं औरंगजेब व मुराद हेही आपआपल्या तयारीनिशी येऊन चंबळेच्या दुसऱ्या कांठावर उतरले. मुराद जितका साहसी, तितकाच तो युद्धकलेंत अज्ञान होता. त्यानें नदीपार होऊन युद्ध करावयाचा विचार केला. पण औरंगजेब महा वस्ताद ! त्यानें दाराला ठकविण्यासाठीं आपला तळ तेथेंच ठेवून कोणाला न कळत दुसऱ्या एका ठिकाणाहून तो नदीपार झाला. व आग्र्यापासून सात आठ कोश दूर, यमुनातिरास असलेल्या शामनगरांत त्यानें आपला दुसरा तळ दिला.

शत्रूनें चंबळा नदी उतरून आग्र्याजवळ यमुनेच्या

कांठीं तळ दिला आहे, ही बातमी ऐकतांच दारांला मोठें आश्चर्य वाटलें व तो आपलें सैन्य घेऊन शामनगरास आला. चार दिवसपर्यंत दोहों पक्षांतून एकही युद्धास आरंभ करीना. शेवटीं पांचवे दिवशीं एकदांचा युद्धास आरंभ झाला.

दाराच्या डावे बाजूस त्याच्या पक्षाचे राजा रामसिंह व चतुरसाल आपापला पराक्रम दाखवूं लागले. त्याचे उजवे बाजूस कलिउल्ला नामक त्याचा सेनापती होता. औरंगजेबानें ह्याला गांठून पुष्कळसें द्रव्य दिलें व रणांतून पळावयास सांगितलें. अर्थात् त्या वेळीं औरंगजेबाचा जय झाला. कपटपटु औरंगजेबानें समरांगणांत कलिउल्ला सेनापतीचा चांगला सन्मान केला व मूर्ख मुरादाला त्या वेळेपुरता " हिंदुस्थानचा बादशाह " ह्मणून संतोषीत केलें.

इकडे काशीच्या युद्धांत दाराचा मुलगा सुलेमान, सुलतान सुजा ह्याचा पराभव करून बापास तें वर्त्तमान कळविण्यास मागें फिरला असतां त्यानें बापाच्या पराभवाची बातमी ऐकली. तो त्याचवेळीं आपल्या परिवारासह काश्मिराकडे पळून गेला.

थोड्याच व दिवसांनीं युक्ति प्रयुक्ति करून औरंगजेबानें आग्रा घेतल्यावर त्यानें आपले बापास ह्मणजे शाहाजहान बादशाहास कैदेंत टाकिलें. बादशहाला

दोन मुली होत्या. एकीचें नांव रोषनआरा व दुसरीचें नांव जहानआरा. पैकीं रोषन्आरा हिचा औरंगजेबावर फार लोभ असल्यामुळें, तिनें ह्या आपल्या राज्यलोभी भावांस सहाय करावयाकरितां सर्व प्रकारचा गुप्त समाचार कळवीत असावें. बादशहाची दुसरी कन्या जहान्आरा, रोषनआरेपेक्षां रूप गुणांनीं श्रेष्ठ असून ती बापाची अत्यंत लाडकी व दाराच्या हितचिंतनांत तत्पर होती. पण औरंगजेबाच्या बुद्धिवैभवापुढें सर्वांचेच उपाय हरले, तेथें तिचें तरी काय चालणार ?

ह्याप्रमाणें औरंगजेबानें आग्रा हस्तगत करून घेतल्यावर तो दिल्लीस गेला. रस्त्यानें मथुरेहून मुरादाला ही बरोबर घेतलें. मुराद सदा मदिरापान व वेश्यासंग ह्यांत निमग्न असे. एके दिवशीं तो दारूच्या धुंदींत वेश्याजनाबरोबर क्रीडा करीत असतां, अति दारू प्याला मुळें बेशुद्ध होऊन पडला. औरंगजेबाला हेंच पाहिजे होतें. त्यानें ही संधि साधून त्याच रात्रीस त्याला कैदेंत टाकिलें. व निर्वेधपणें आग्र्यास जाऊन आपल्यास राज्याभिषेक करून घेतला. दारा पंजाबाकडे पळून गेला. व बंगाल्यातून सुजा पुन्हां जय्यत तयारी करून लढावयास निघाला. यशवंतसिंहाच्या मनांत उज्जनीच्या युद्धांतला अपजय अजून सलतच होता, ह्मणून तोही जय्यत तयारीनें आग्र्यास यावयांस निघाला होता.

प्रकरण सत्ताविसावें.

आग्रा.

T'is something yet if, as she passed,
Her shade is o'er the lattice cast,
" What is my life, my hope, he said-
" alas ! a transitory shade ?

" Scott. "

पुष्कळ दिवसपर्यंत प्रवास करून यशवंतसिंहाचें सैन्य एकदांचें आग्र्यास पोंचलें. औरंगजेबाचा पराक्रम मोठा. ह्यामुळें त्याच्याशीं एकदम सामना घेणें यशवंतसिंहास बरें वाटलें नाहीं. त्यानें संधि साधून त्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला. व ह्यासाठींच तो भिन्न वेषानें आग्र्यांत शिरला.

यमुना नदीची शोभा व आग्रा शहराचें सौंदर्य पाहून मोहित होणार नाहीं, असा कोण मनुष्य आहे ? ताजमहाल, मोतीमसिद, दिवानखास, दिवानआम, रंगमहाल व आरसेमहाल ह्यासारखीं अप्रतिम स्थळें ज्या शहरांत आहेत; त्या आग्रा शहराचें किती व काय व-

र्णन करावें ! आग्र्यांत जिकडे नजर फेकावी, तिकड-चीच ती होऊन जाते ! असो.

औरंगजेब बादशाही मयूरासनावर बसला असून जिकडे तिकडे रक्तवर्ण रेशमी कपड्यांनीं सर्व मंदिर मढ-वून टाकिलें होतें. चोहोंकडे राजे, महाराजे, उमराव वगैरे दरबारी मंडळीही उत्तम लाल पोषाख करून रक्त-वर्ण मणि माणकांचे अलंकार धारण करून बसल्यामुळें सारा दरबार अमरपुरीसारखा भासत होता. ह्या दरबारा-समोर जवळच एक भव्य मंदिर होतें. त्याच्या चोहोंबा-जूस असलेले रौप्य स्तंभ चकाकत असून त्यांवरील लाल रेशमी पडदे आणि त्यांच्या आंतील मच्छलीपट्टणचीं छिटें, हीं मनोहर वेलींनीं शोभत होतीं. भूमीवरील गालिच्यांची कुशलता आणि त्यांवरील फुलें पाहून, ह्यावर पाय दिला असतां हीं सुकुमार फुलें खराब होतील ह्मणून हिंडणारे लोक त्यावर पाय देण्यास संकोचत होते. बाहेर कि-ल्ल्याच्या तटापर्यंत जिकडे तिकडे पताका तोरणें व पुष्पमा-ला ह्यानें सर्व प्रदेश श्रृंगारला असून सैन्याचे लोक रांगेनें उभे होते. जवळच त्यांचीं रणवाद्यें सर्वांस उत्तेजन देत वि-जयगीत गात होतीं. बालसूर्याच्या प्रकाशांत बंदुकीच्या सं-गिनी चमकत असून, त्यायोगानें पहाणारांचे डोळे दिपत होते. इंग्रज, फ्रेंच, वगैरे अनेक जातींचे लोक बादशहाच्या आश्रयानें राहून त्याचा जयजयकार करीत होते. किल्ल्याच्या

बाहेर, शहरांत व जिकडेतिकडे, लोकांच्या झुंडीच्या झुंडी फिरत होत्या. त्यादिवशीं पूर्वींच्या रीतिप्रमाणें औरंगजेबानें आपली सुवर्णतुला केल्यावर आपल्या प्रधान व उमराव वगैरे मंडळीचीही सुवर्णतुला केली. नंतर प्रत्येक सरदार, मनसबदार, वगैरे मानकऱ्यांनीं बादशाहास बहुमूल्य नजराणा देऊन त्याला संतोषित केल्यावर जगास सहज वश करणाऱ्या वेश्याजनांनीं आपल्या अपूर्व व मंजुल नृत्य गीतांनीं सभासदांचें मन मोहून टाकिलें. ह्या वेश्या अत्यंत रूपसंपन्न असून नृत्य व गायन ह्यांत निपूण होत्या. शहाजहान बादशहा ह्यांना सर्वदां आपल्या जवळ ठेवण्यांत आनंद मानी व कधीं कधीं तर त्यांना जनानखान्यांत देखील नेत असे. पण इंद्रियसुखाची किंचितही चाड न ठेवणारा औरंगजेब ह्या वेश्याजनांला जवळ देखील फटकूं देत नसे. तरी आज महोत्सव असल्यामुळें त्यांना दरबारांत बोलविलें होतें व त्याप्रमाणें त्या येऊन त्यांनीं आपलें कामही सुरूं केलें होतें.

यमुना किनाऱ्यास मल्लयुद्ध वगैरे अनेक प्रकारचीं युद्धें होऊं लागून राजवाड्याच्या बाऱ्यांमधून बादशाही बेगमा, वगैरे जनानखान्यांतील मंडळी तीं पाहूं लागली. शेवटीं मदोन्मत्त झालेल्या दोन हत्तींची टक्कर व्हावयास आरंभ झाला. शुंडादंडानें एकमेकांची शक्ति अजमावून आणि दांताच्या आघातानें एकमेकांस फोडून टाकून हे

दोन्ही हत्ती फार भयंकर रीतीनें लढत होते. कांहीं वेळ युद्ध झाल्यावर एक हत्ती हरून तेथून पळाला व दुसरा त्याच्यामागें लागला. त्याच्या शांतीकरितां बरेंच दारूकाम सोडलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. ह्या गर्दींत बिचारे दोन माहूत मात्र खालीं पडून मरण पावले. ह्याप्रमाणें बादशाहाचे बालिश खेळ पाहून नरेंद्र खिन्न होत्साता हळुहळु तेथून यमुना किनाऱ्यास आला व हात तोंड धुवून एका वृक्षाच्या छायेंत निद्रिस्त झाला.

नरेंद्र जेथें निजला होता, तो तमालवृक्ष विस्तृत व सुंदर असून त्याची छाया दाट होती. ह्या वेळीं भर-दोन प्रहर असल्यामुळें, सूर्यकिरणानें किंचित थकलेले एक दोन पक्षी त्या वृक्षावर मृदु स्वरानें कांहीं गात होते. नवळच एका झाडाजवळ एक जुनें थडगें असून त्याचे कांहीं दगड इकडे तिकडे अस्ताव्यस्त पडले होते. थड-ग्यावर लहान लहान झाडें व गवत हीं उगवलीं असून एका दगडावर एक कविता कोरली होती. तिचा भा-वार्थ असा.

" गड्या, माझें नांव जाणावयाची तुला काय ह्मणून अवश्यकता वाटते ? ह्या जगांत मी एक दुःखी व अभागी प्राणी होतों. कदाचित् तूंही मजसारखाच अभागी असशील ! असलास, तर समदुःखी समजून अ-श्रुचा एक बिंदु मजकरितां गाळ ह्मणजे ! आणखी काय!"

ही कविता नरेंद्रनाथ वाचीत् असतां, यमुना तिरानें वहात असलेल्या मंद मंद शितळ वायुनें त्याला झोंप लागली. तेथें तो किती वेळपावेतों निद्रिस्त होता, हें आम्हाला ठाऊक नाहीं, पण तो निद्रिस्त असतां त्यानें एक विचित्र स्वप्न पाहिलें, तें असें. जवळ असलेल्या थडग्यांतलें प्रेत जिवंत होऊन उठून बसलें ! ही एक मुसलमान जातीची स्त्री होती. अखेरच्या वेळची तिची ती फिक्कट मुद्रा अझून जशीच्या तशीच कायम होती. तिचे डोळे खोल गेलेले, शरीर क्षिण व सर्व अवयव दुःखानें गांजलेले असून ती तशा स्थितींतही थडग्याच्या दगडावर कोरलेली करुणाजनक कविता करुणार्द्र स्वरानें गात होती. ती ऐकून नरेंद्राच्या डोळ्यांतून एक दोन अश्रु बाहेर आले. इतक्यांत तिनें एक दुसरेंच गाणें गावयास आरंभ केला.

नरेंद्राला त्या गाणारणीचा स्वर अपरिचित वाटला नाहीं. त्यानें जलेखेला तेव्हांच ओळखिलें.

इतक्यांत नरेंद्राचें स्वप्न संपलें. तो दचकून चोहों कडे पाहूं लागला, पण त्याच्या दृष्टीस कोठेंच कोणी पडेनां. ह्या वेळीं सूर्य अस्तास गेला असून संध्याकाळरुपीं स्त्रीचे ललाटावर एक शुभ्र तारा हिरकणीसारखा शोभत होता. सायंकालीन मंद समीर हळु हळु मंजुळ

गान करीत होता व यमुनेचें नील जळ अधिकतर नीळ वर्ण धारण करून स्वैर गतिनें वहात होतें.

नरेंद्र अत्यंत विस्मित झाला. स्वप्नांत जलेखेचें गाणें त्यानें तीन चार वेळ ऐकिलें होतें, पण ती कोण असावी हें त्याला उमजेना. जलेखा ह्या लोकांत रहाणारी मानव कन्या नसून अप्सरा असावी, असें त्याला वाटे. पण पुन्हां हाही विचार मनांत येई कीं ही अप्सरा असून मनुष्यावर इतकी मोहित कां होते ! ह्या संबंधानें विचार करीत असतां तो फिरत फिरत मागें सांगितलेल्या पडक्या थडग्याजवळ आला, आणि थडग्यांतून एकदम जलेखा बाहेर पडली ! त्या वेळीं तिचे शरीर क्षीण व पांडुर-वर्ण असून मुख खरोखरच नुकत्याच जिवंत झालेल्या मृत मनुष्याप्रमाणें पिंगट दिसत होतें. पण डोळे आणि इतर अवयव तेजःपुंज असून ती रागानें नरेंद्राकडे पहात अधरोष्ट चावीत होती. तिनें आपल्या छातींत चोळीच्या आंत कट्यार खोंचली होती. तिला पाहून " काय, हिनेंच का मथांचें गाणे गाईलें? मला तर वाटत नाहीं बुवा ! " असें नरेंद्र पुटपुटला.

जलेखेनें नरेंद्रास आपल्या मागें यावयाची खुण करून आपण पुढें चालली. कांहीं दूर गेल्यावर किल्ल्याच्या आंत पोंचून तिनें बादशाही महालाच्या एका अंधाऱ्या खो-लींत प्रवेश केला. नरेंद्र येथपर्यंत तर विचार केल्याखेरी-

जच तिच्या मागें आला; पण जेव्हां ती त्या अंधकारमय जागेंत जाऊं लागली, तेव्हां तो भिऊन तेथेंच थांबला. कारण, येतांना त्याचें लक्ष तिच्या छातींत असलेल्या कटारीकडे गेलें होतें ! ! त्यानें तिला हाक मारून ह्मटलें—तूं कोण आहेस तें मला ठाऊक नाहीं, तशांत राजमहालांत जाण्याची परवानगी सुद्धां मला मिळाली नाहीं ! अशा स्थितींत तुजबरोबर येणें मला नीट दिसत नाहीं.

जलेखा ह्मणाली—तुह्माला परवानगी नसली, ह्मणून मलाही नाहीं असें तुह्मी समजूं नका.

नरेंद्र—पण तूं कोण आहेस, ह्याचा उलगडा होईपर्यंत मी तुजबरोबर येऊं इच्छीत नाहीं.

जलेखा कर्कश स्वरानें म्हणाली—" पुरुषासारखे पुरुष असून तुम्ही मरणाला भ्यावें, हें योग्य नाहीं. माझ्या मनांतच जर तुम्हाला मारावयाचें असतें, तर मजजवळ ही कटार होतीच. केव्हांच तुम्हाला ठार केलें असतें! आणि आतां तरी काय; मनांतच आलें, तर हें पिस्तुल पहा ! ह्यानें तुह्माला मारावयाला मला कितीसा उशीर लागणार आहे ? " असें म्हणून तिनें आपल्या पदराखालून एक भरलेला पिस्तुल बाहेर काढून नरेंद्राच्या छातीशी लावला व म्हणाली—हें पहा, अंमळ ह्याचा चाप दाबला कीं तुमचें जीवन संपलेंच म्हणून समजा. पण नको; ही

कटार मी दूर फेंकून देते. त्याचप्रमाणें हा पिस्तुलही पण येथेंच टाकिते ! मला वाटतें, आतां तरी मजसारख्या शस्त्रहीन अबलेच्या बरोबर यावयास तुमच्या सारखे बंगाली वीर भिणार नाहींत ! ! ”

नरेंद्र विशेष कांहीं न बोलतां तिच्यामागें चालूं लागला. दोघेही कांहीं दूर गेल्यावर जलेखेनें त्याला एके जागीं कांहीं वस्त्रें दाखवून तीं आंगावर धारण करावयास सांगितलें. नरेंद्र तीं उचलून पहातो, तों तीं तातार देशीय बायकांचीं वस्त्रें आहेत, असें त्याला समजलें. तीं पाहून नरेंद्र आश्चर्यचकित होत्साता जलेखेकडे पाहूं लागला. जलेखा गंभिर स्वरानें ह्मणाली—उशीर करूं नका. ज्या दारानें आपण आलो, तें आतां बंद असून चोहोंकडून खोजेलोक नागव्यातरवारीनिशीं पहारा करीत आहेत. हें अंतःपुर असल्यामुळें, ह्यांत तुह्मी पुरुष आलां आहांत, हें त्यांना समजतांच तुह्माला ते कापून टाकतील.

नरेंद्र आश्चर्यचकित होऊन विचार करूं लागला, तों त्याला जलेखेचें म्हणणें खरें वाटलें, आणि मनांत नसतांही त्याला तातार देशीय बायकांचा पोशाख करावा लागला. जलेखेनें त्याच्या हातांत बांगड्या भरून मुसलमानी रिवाजाप्रमाणें त्याच्या तोंडावरून घुंघुटही काढून दिला. याप्रमाणें स्त्रीवेश घेऊन नरेंद्र जलेखेच्या मागें चालला. त्या दोघांनीं किती घरें आणि किती आंगणें

ओलांडलीं असतील, याचा पार नाहीं. दारांवर जिकडे तिकडे नागव्यातरवारी घेऊन खोजेलोक पहारा करीत असून शेंकडो परिचारिका कामानिमित्य इकडे तिकडे फिरत होत्या. जलेखेला पाहून सर्वांनीं वाट दिली. नरेंद्रही तिजबरोबरच होता. तो जसजसा अंतःपुरांत जाऊं लागला, तसतसा त्याला विस्मय वाटून तेथलें ऐश्वर्य, शिल्पकला व विलासप्रियता ह्यांची साक्ष त्याला पटूं लागली. संगमरवरी दगडांचीं कितीकच घरें असून त्यांच्या भिंतींवर कारागिरानें अजब चातुर्यानें खोदलेलीं नानाप्रकारचीं फुलें व त्यांतच नानाप्रकारचीं रत्नें बसवून केलेलें कुसर काम पाहून तो आश्चर्यानें थक्क झाला. पांढऱ्या संगमरवरीचीं सुंदर गवाक्षें, सुंदर कारंजीं व वेली चढावयाकरितां सुंदर पुष्पाधार ही मोठीं मजेदार दिसत असून त्यांच्या आधारानें चढलेल्या वेलींच्या सुंदर पुष्पांचा घमघमाट चोहोंकडे सुटला होता. नानाप्रकारच्या हंड्या व झुंबरें ह्यांतील प्रकाशानें जिकडे तिकडे प्रकाशमय झालें होतें, व त्या प्रकाशांत बादशाहाच्या जनानखान्यांतील अतुल्य रूपवति बेगमा आपल्या इच्छेनुरुप भ्रमण करीत, कधीं वेणींत खोचावयाकरितां फुलें तोडीत व कधीं आनंदानें गीत गात इकडून तिकडे फिरत होत्या. सारांश, ह्या वेळीं राजवाडा आनंदानें डुलत होता.

नरेंद्र ही सर्व शोभा पहात औरंगजेबाच्या विला-

स मंदिरांत पोंचला. तेथें औरंगजेब आपल्या आवडत्या बेगमांबरोबर सारीपाट खेळत होता. सारीपाट खेळण्याची जागा विस्तृत असून नानाप्रकारच्या संगमरवरी पाषाणानें बांधलेली होती; व नरदांच्या ऐवजीं स्वरूपसंपन्न तरुण स्त्रियांची योजना असून, रंगवैचित्र्याकरितां त्यांना निरनिराळ्या रंगांच्या पोशाखानें नटविलें होतें. औरंगजेबाची ही विलासपटुता पाहून नरेंद्राला जें हंसें आलें, तें तो दाबूं शकला नाहीं.

तेथून थोड्याच अंतरावर औरंगजेबाचें क्रिडाभुवन होतें. त्यांत तिघी चौघी बेगमा आनंदानें सतार, सारमंडळादि वाद्यें वाजवीत गीत गात होत्या. जवळच यमुना तिरांवर दुसरें एक मंदिर असून त्यांतील एका प्रशस्त खोलींत एक दोन बेगमा जलतरंग वाजवून आपली करमणूक करून घेत होत्या. ह्याशिवाय सर्वत्र शांत होतें. नाहीं म्हणायला यमुना तिरचा थंड वारा त्या बेगमांच्या केशपाशाला मजेनें स्पर्श करून त्यांच्या कपोलाचें चुंबन घेत होता. नरेंद्र ह्या खोलीच्या जवळ उभा राहून तेथली व जवळच्या यमुना तिराची शोभा पहात मंद वायु घेत होता. ह्यावेळीं शरदांतलें चांदणें असल्यामुळें रात्र मोठी मोहक वाटत होती. अशाच रात्रीस नरेंद्र वीरनगरांतून निघाला होता. ह्यामुळें, तो प्रसंग त्याला आठवून हेमलतेच्या चिंतनांत त्याचें हृदय क्षणेक तद्रूप

झालें, व आकाशाकडे पहात क्षणाक्षणीं श्वास टाकीत दुसरीकडे तो चालता झाला. पण पुन्हां त्याच खोली-च्या दुसऱ्या बाजूकडे वळून पहातो, तों तिकडे त्याला मनुष्यांचा गलबला ऐकूं येऊं लागला. ह्या शांत जागेंत हा गलबला ऐकून नरेंद्राला फार आश्चर्य वाटलें. व तें काय आहे, हें पहावयाच्या उत्कंठेनें तो तिकडे वळला. जसजसा तो जवळ जाऊं लागला, तसतसा स्त्रियांचा मधुर व कोमल शब्द आणि हास्यध्वनि त्याला स्पष्ट ऐकूं येऊं लागला. अखेरीस तो जातांजातां एके ठिकाणीं आला. येथें दाटी फार झाली होती. हें ठिकाण ह्मणजे एक विस्तिर्ण आंगण होतें. त्यांत नानाप्रकारचीं फुलझाडें लाविलीं असून चोहों-बाजूंस असलेल्या मंदिरांतून टांगलेल्या पुष्पमाला वाऱ्यानें हालत होत्या. फुलझाडें फुलांनीं डवरलीं असून जागोजागीं तबकांतून पुष्पगुच्छ ठेविले होते व फुलांच्या सुवासानें सर्वत्र सुगंधमय झालें होतें. सुंदर कारंजीं रात्रींच्या वेळीं उडत असतांना त्यांतील पाणी रौप्य स्तंभाप्रमाणें व जलतु-षार मौक्तिकांप्रमाणें दिसत होते. वृक्षांच्या हारीमधून जिकडे तिकडे दिव्यांच्या रांगा दिसत होत्या. ह्याप्र-माणें तेथली शोभा पाहून इंद्राच्या अमरावतीच्या नमु-न्यावरच हा बेगममहाल आज सजविला आहे कीं काय असें वाटत असे. वर सांगितलेल्या आंगणांतच एक विचित्र बाजार भरला असून त्यांत खरेदी विक्री करणारांची मारे

गर्दी झाली होती. इतर बाजारांपेक्षां ह्या बाजारांत अंतर एवढेंच कीं ह्यांत घेणार देणार सर्व बायका होत्या. हिंदुस्थानांतील मुख्यमुख्य राजेरजवाड्यांच्या व अमिर उमरावांच्या सुंदर सुंदर बायका ह्या दुकानदारिणी, व बादशहाच्या बेगमा त्यांचीं गिऱ्हाइकें. माल अगदीं उंची. सारें जडजवाहिर व उंची कापडचोपड. ह्याशिवाय दुसऱ्या हलक्या मालाचें नांव नाहीं ! जें जिला हवें असेल, तें तिनें सांगितलेली किंमत देऊन विकत घ्यावें. हा प्रकार पाहून नरेंद्रास अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यानें पुष्कळ राजमंदिरें पाहिलीं होतीं, पण ही शोभा, हें वैभव आणि ही अप्सरेसही लाजविणारी स्त्री मंडळी त्याच्या दृष्टीस कोठेंच पडली नव्हती.

दरवर्षीं वर्षप्रतिपदेच्या दिवशीं मोंगल बादशहा बेगम महालांत अशा प्रकारचा बाजार भरवीत असे, हें आमच्या इतिहासज्ञ वाचकांस ठाऊकच असेल ह्या बाजारास * मीनाबाजार असें नांव होतें. व येथेंच हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांच्या सुंदर बायका आपल्या जवळील जवाहिरांचें इच्छित मोल मिळवीत. ज्या राजाला सुंदर कन्या किंवा स्त्रिया असत, ते बेगमसाहेबाच्या परिचयासाठीं त्यांना ह्या बाजारांत पाठवीत. सारांश, हा बाजार म्हणजे एक " स्त्रीमुखसौंदर्य प्रदर्शन "

* मीनाबाजार=Fancy bazar, fancy fair.

असून त्याचें निरीक्षण केवळ बादशहावांचून दुसरा कोणताही पुरुष करूं शकत नसे.

चालत आलेल्या नियमाप्रमाणें त्या दिवशींच वर्षप्रतिपदा असल्यामुळें औरंगजेबानें हा बाजार भरविला होता, व आपल्या एक दोन प्रिय बेगमांस बरोबर घेऊन दुकानांची शोभा पहात तो हिंडत होता. भावांशीं लढत असतांना त्याची बहिण रोशनआरा हिनें त्याला फार फार मदत दिली होती, ह्यामुळें ह्या बाजारांत हिचें प्रस्थ फार होतें. दुसरी बहिण जहानआरा हिनें दाराचा पक्ष घेतला होता, ह्यामुळें ह्या महोत्सवांत ती मुळींच नव्हती.

विस्मयापन्न दृष्टीनें ही सारी शोभा पहात असतां नरेंद्रानें एक मौज पाहिली, ती अशी.

एक स्वरुपसुंदरा मोंगलकन्या ह्या बाजारांत बहुमुल्य वस्त्रें वगैरे विकत असतां औरंगजेब तिच्या दुकानावर जाऊन वस्तूंची किंमत विचारूं लागला. वस्तूंच्या किंमती सांगण्यांत व करण्यांत दोघेंही पटाईत असल्यामुळें एकदां एका पैशाच्या अंतरामुळें मोठी भवतिनभवति होऊन औरंगजेब तिला म्हणाला—" तुम्हारी चीज अच्छी नहीं, तुम ठगने आई हो. "

त्यावर ती मोंगलकन्या हंसत हंसत म्हणाली. "आपने ऐसी चीज देखीही नहीं, इसका भाव क्या जानोगे! आप इस चीजके लायक नहीं हो. आगे जाव, आपके लायक थोडे दामकी चीज बहुत मिलेंगी. "

त्याप्रमाणें पुष्कळ वादविवाद झाल्यावर औरंगजेबानें तिनें मागितलेलें बक्षीस कबूल केलें व तिच्या आंगावर रुप्यांच्या जागीं मोहोरा फेकून देऊन तो तेथून चालतां झाला.

ह्यानंतर नरेंद्र आरसेमहालाकडे वळला. तेथें कांहीं विशेषच मौज चालली होती. बादशहा व बेगमा ह्यांच्या जलक्रिडेसाठीं हा महाल बांधिला असून ह्यांत सर्वत्र पांढऱ्या संगमरवरी गुळगुळित दगडांची फरशी केली होती व त्यावरुन स्वच्छ पाणी वहात होतें. ह्यामुळें, तेथें स्नान करणारांना फरशीवर आपलीं प्रतिबिंबें पाहून, खालीं पुष्कळ मासेच क्रिडा करीत असावेत, असा भास होत असे. चोहोंकडून फवाऱ्यांतील निर्मल जलधारा जोरानें वर उडून तुटलेल्या मौक्तिकमालेची शोभा दाखवीत होत्या. कोठें कोठें फवाऱ्यांतील जलधारांवर प्रकाशामुळें वरील झुंबरांच्या रंगांचें परावर्तन झाल्यामुळें त्यांची शोभा कांहीं विचित्र दिसत होती. चोहोंकडे भिंतीस मोठ मोठे आरसे लावले असून स्नान करणारांचे सर्व अवयव त्यांत स्पष्ट दिसत होते. बादशहा व त्याच्या आवडत्या बेगमा, अशा ह्या मनोहर जलमंदिरांत जलक्रिडा करीत असत, म्हणून पृथ्वीवरील सर्व देशांतून पाहिजे ती सुंदर वस्तू आणून हें मंदिर शृंगारलें होतें. असो. आजच्या ह्या वर्षप्रतिपदेचा अपूर्व उत्सव पहावयास आ-

लेल्या नानादेशच्या राण्या व राजकन्या वरील आरसे-महालाची अपूर्व शोभा पहाण्यांत गुंतल्या होत्या. इतक्यांत स्त्रीवेशधारी नरेंद्राबरोबर असलेल्या जलेखेनें त्याचा हाथ धरुन त्याला एका आरशासमोर नलें व त्यांत त्याला पहावयास सांगितलें. नरेंद्रानें त्यांत जें पाहिलें, त्यामुळें तर तो अगदीं चकित होऊन स्तब्ध झाला. त्याच्या डोळ्याच्या पापण्या देखील हलेनात. सारांश, तो अगदीं दगडाच्या निर्जिव पुतळ्याप्रमाणें हलनचलन राहित होऊन त्या आरशाकडे पाहूं लागला.

वरील मजकूर वाचून वाचक कदाचित् आह्माला विचारतील कीं "नरेंद्राला कांहीं रोग तर झाला नव्हता ? किंवा तो स्वप्नांत तर नव्हता ?"

पण वाचकहो, नाहीं. नरेंद्राला कांहीं रोग झाला नव्हता, किंवा तो स्वप्नांतही पण नव्हता. फार दिवसांपासून हृदयांत जतन करून ठेवलेल्या हेमलतेच्या मूर्तीचें दर्शन त्याला आरशांत झालें असून त्यामुळें त्याची अशी स्थिति झाली होती.

नरेंद्र वेड्यासारखा त्या आरशांतील हेमलतेच्या प्रतिबिंबाकडे पहात असतां त्याचें हृदय उडूं लागलें व नेत्रांची हालचाल बंद झाली. पण तितक्यांतच आरशांतील हेमलता तेथून दुसरीकडे चालती झाली व ह्यामुळें नरेंद्र शुद्धीवर येऊन मागें पाहूं लागला. पण ती त्याला

दिसली नाहीं. इतक्यांत एक बुरखा घेतलेली रजपुताणी नरेंद्राच्या समोरून जाऊं लागली. तिजबरोबर रजपुतांच्या पुष्कळ बायका होत्या. तरी नरेंद्र तिच्यामागें मागें जाऊं लागला. ही रजपूत वेषधारिणी सुंदरी कोण होती, हें नरेंद्राला ठाऊक नव्हतें, तरी तो तिच्यामागें जाऊन, ती कोण असावी, हें पहावयाची संधि शोधूं लागला. पण तिच्या बोटांखेरीज आणि बुरख्यानें वेष्टिलेल्या अंगाखेरीज कांहीं दृष्टीस पडलें नाहीं. रजपुतांच्या चालीरीतींस अनुसरून तिनें तोंडावरून पदराचा घुंघट घेतला होता, यामुळें तिचें मुखमंडळ त्याच्या दृष्टीस मुळींच पडलें नाहीं. हें पाहून निदान तिच्या करांगुलीचें तरी स्पर्शसुख मिळवावें, ह्मणून तो प्रयत्न करूं लागला, पण तो सुद्धां निष्फळ झाला. त्याचा हात कापूं लागला व मस्तक घामानें डबडवून गेलें. नरेंद्र स्त्रीवेषांत असल्यामुळें त्याला पुन्हां इच्छा झाली कीं एकदां आपण हिचें नांव गांव विचारावेंच. पण तसें करण्यास त्याची वाचा उलली नाहीं. थोड्याच वेळानें ती रजपूत वेषधारिणी आपल्या बरोबरच्या स्त्रियांसह तेथून निघून गेली. नरेंद्रही तिच्याबरोबरच निघाला. पुष्कळशीं राजमंदिरें, कित्येक देवळ्या व अगणित बगिचे ओलांडून त्या सर्वजणी बाहेर आल्या, व आपापल्या पालखींत बसूं लागल्या. नरेंद्र ज्या स्त्रियेच्या पाठीमागें येथपर्यंत आला

होता, तीं स्त्रीही आपल्या पालखींत बसावयाची तयारी करूं लागली. पालखींत बसावयाचे अगोदर तिनें एकदां थोडा वेळ उभें राहून शांत चित्तानें राजवाड्याकडे व यमुनेकडे पाहिलें. यावरून तिनें पूर्वी कधीं तो राजवाडा पाहिला नसावासें वाटत होतें. यमुनेकडे पहात असतां वायूनें तिच्या मुखावरील पदर हलत होता. ही संधि साधून नरेंद्र सतृष्ण नेत्रानें तिजकडे पाहूं लागला. त्याचे हृदय वितळूं लागलें. पण तो पदर उडाला नाहीं. नरेंद्राची आशा भंग झाली. ती सुंदरा तितक्यांतच आपल्या पालखींत बसून तेथून निघून गेली. पण ही कोण ? हेमलता कीं काय ? हिच्या शरीराची ठेवण, चालण्याची ढब व दृष्टीस पडलेल्या तिच्या अंगुलिका, ह्यांवरून नरेंद्राच्या मनांत "बहुतकरून तीच ही असावी" असा तर्क येऊन, तिचे ते गोंडस हात आपल्या हातात घेऊन प्रेमानें क्षणेक आपल्या वक्षस्थलावर कधीं ठेवीन असें त्याला झालें होतें. यावरून आह्माला वाटतें, ती हेमलताच असावी !

पण ही हेमलता आग्र्याच्या बेगम महालांत कशी आली ? नरेंद्रा ! प्रेमांध होऊन भलतीलाच तर तूं हेमलता समजत नाहींस ?

वाचकहो, हेमलतेला सोडून आपण आज बरेच दिवस नरेंद्राबरोबर फिरत आहोंत, तेव्हां एकदां चला

वीरनगराकडे बिचाऱ्या हेमलतेची काय स्थिति आहे, हें पाहून तरी येऊं.

प्रकरण अठ्ठाविसावें.

बंधुप्रीति.

But he who stems a stream with sand,
And fetters flame with flaxen band,
Has yet a harder task to prove,
By firm resolve to conquer love.

"Scott."

वीरनगरांतील जमीनदाराच्या वाड्याजवळच एक विस्तिर्ण बगिचा असून त्यामधूनच नदीस जावयास वाट होती. ह्या बागांतच बालपणीं नरेंद्र व हेमलता आनंदानें क्रिडा करीत असत. पण ते दिवस जाऊन हल्लीं तारुण्यांतील गंभीर चिंता व मनाविरुद्ध इतर कार्यें ह्या योगानें नरेंद्राच्या बालपणचा आनंद लोपून गेला असून क्षणोक्षणीं येणारें बालहास्यही नाहींसें

झालें होतें. तो अनाथ होत्साता, देशोदेशीं परिभ्रमण करीत होता, व श्रीश्चंद्र सासऱ्याची संपत्ति मिळाल्यामुळें वीरनगराचा जमिनदार झाला होता. हेमलताही ह्या वेळीं लहान नसून ती श्रीश्चंद्राची गृहिणी झाली होती.

संध्याकाळच्या वेळीं वीरनगरांतील बागेमधून नदीकडेस दोन स्त्रिया चालल्या होत्या. त्यापैकी एक हेमलता व दुसरी श्रीश्चंद्राची विधवा बहिण शैवलिनी होती. ह्या वेळीं हेमलतेचें वय सरासरी १९ वर्षांचें असेल. अवयव क्षीण पण कोमल असून सुंदर होते. डोळे पाणीदार, ओठ लहान, मुखचंद्र निष्कलंक आणि रमणीय; पण वयोमानाप्रमाणें, तारुण्यामुळें अवयवांस येणारी प्रफुल्लता आणि धुंदि तिच्यांत मुळींच दिसत नव्हती. पहाणारांला तिच्या ह्या अकालिक चिंतेचें ज्ञान सहज होत असे. तिच्या तारुण्यास शोभण्यासारखें तिचें सौंदर्य होतें, पण त्यांत तरुणपणांतील तेजी आणि चंचलता मुळींच नव्हती. ती असती, तर हेमलता इतक्या स्थिरतेनें चालली नसती! तिच्या मनांत दुःख नव्हतें. पण हृदय चिंतेच्या भारानें सर्वस्वी दडपून गेलें होतें. तरी तें सर्व, ती निमूटपणें सहन करीत होती. मुखावर आलेला कृष्णवर्ण केशकलाप अंमळ एकिकडेस सारून पहातांच पहाणारांच्या लक्षांत तिचे डोळे कोरडे व चंचलताशून्य आहेत, असें आल्यावांचून रहात नव्हतें.

शैवलिनिचें वय पंचवीस वर्षांचें असून ती विधवा होती हें मागें सांगितलेंच आहे. तिच्या अवयवांत तारुण्यांतील कांति नव्हती. तथापि तिचें शरीर उन्नत व गंभिर होतें. मस्तकावरील कृष्ण केशपाश पृष्ठभागापर्यंत रुळत असून भालप्रदेश सुंदर, डोळे विशाळ व शांत आणि मुखमंडळ गंभिर व कोमल होतें. हिनें विधवा धर्माप्रमाणें शुभ्र वस्त्र परिधान केलें होतें. शैवलिनीचा हेमलतेवर कनिष्ट भगिनीप्रमाणें लोभ होता आणि म्हणूनच त्या दोघी प्रेमपूर्वक गोष्टी सांगत नदीकडेस चालल्या होत्या.

प्रथम लहानपणीं हेमलता नरेंद्राच्या मुखदर्शनांतच आनंद मानीत असे. पुढें यौवनारंभीं नरेंद्रानें तिच्या हृदयमंदिरांत वास केला होता. भोळीबिचारी हेमलता ! तिला न कळतां स्वाभाविक तऱ्हेनेंच तिचें हृदय नरेंद्रमय झालें होतें. प्रेम म्हणजे काय, हें तिला ठाउक नव्हतें. पण जेव्हां नरेंद्राची आणि तिची तुटातुट झाली, बाप मरण पावला व तिला एका भलत्याच व्यक्तिची गृहिणी होऊन नरेंद्राच्या मूर्तीला हृदयांतून सर्वस्वी विसर्जन करण्याचा प्रसंग आला; तेव्हां मात्र प्रेम म्हणजे काय, हें हेमलता समजून चुकली ! मर्म्मभेदी दुःखानें तिचें हृदय विदीर्ण होऊं लागलें. पण तिनें हें वर्म कोणाजवळ सांगावें ? रात्रीच्या रात्री तिनें नरेंद्राकरितां रडून जागरणांत काढाव्या. पण इकडे कोणाचें लक्ष होतें ? ह्याप्रमाणें वि-

योगाच्यां घोर यातनेंत तिनें कित्येक महिने लोटले व त्यायोगानें ती अगदी क्षीण झाली.

शैवलिनी आपल्या वयाच्या पांचव्या वर्षींच विधवा झाली होती. ती सर्वदा सासरीं राहून मधून मधून वीरनगरास भावाच्या भेटीस येई. ती तीक्ष्णबुद्धि असल्यामुळें दोन तीन वेळेच्या येण्यांतच तिनें हेमलतेचें मनोगत जाणलें, आणि मनांत विचार केला कीं जर ह्या मुलीवर चांगली नजर ठेविली नाहीं, तर पुढें आपल्या भावास जड जाईल. किंबहुना त्याच्या संसाराचें मातेरेंही होईल. असा विचार करून ती तेव्हांपासून वीरनगरांत भावाजवळ राहूं लागली.

शैवलिनीच्या स्नेहयुक्त आणि बोधपर बोलण्यानें हेमलतेचें दुःख किंचित कमी झालें. शैवलिनीला मानवी स्वभावाची परीक्षा उत्तम असल्यामुळें तिनें हेमलतेचें मनोगत जाणिलें, तरी कधींहीं तिचा तिरस्कार किंवा अवहेलना केली नाहीं. धाकट्या बहिणीप्रमाणें तिला उपदेश करून ती तिचें शांतवन करीत असे.

अशा रीतीचें आचरण पाहून हेमलतेला कसें बरें बरें वाटणार नाहीं ! शैवलिनी बोधपर गोष्टी सांगण्यांत पटाईत असल्यामुळें, हेमलता तिजकडून कधीं दमयंतीची तर कधीं राममार्या सीता हिची कथा ऐकून आपलें चित्त रंजवीत असे. ह्याप्रमाणें रोज तीन प्रहर रात्रपर्यंत ती धर्मपरायण शैवलिनी आपल्या भावजयेस पुण्यकथा सां-

गून तिची कालक्रमणा करी. त्या ऐकून " जगीं सर्व सूखी असा कोण आहे " ह्या साधूक्तीची प्रतिति तीस येऊन ती ह्मणे–धर्मपरायणा सीता दुःखी, पतिप्राण रक्षणकर्त्री साध्वि सावित्री दुःखी, त्याचप्रमाणें बिचारी पतिप्रेमाकांक्षिणी दमयंतीही दुःखी ! तेव्हां मजबद्दल मला एवढें वाईट वाटावयाला नको. त्या बिचाऱ्या पतिव्रता होत्या, आणि मी–माझ्या देवतुल्य पतीला सोडून नरेंद्राचें चिंतन करावें, हें कांहीं नीट नव्हे. मी सर्वस्वी अबला, मी कांहींच करूं शकत नाहीं. भगवन्, अनाथनाथ ! ह्या हृदयांतून हे पापविचार दूर कर. असा विचार करीत असतां तिच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह चालूं व्हावा व शैवलिनीनें तो पुसून तिची समजूत करावी.

ह्याप्रमाणें शैवलिनीच्या प्रेमळ वर्तनानें क्रमाक्रमानें हेमलतेच्या मनास शांतता आली व तिच्या हृदयांतील प्रेमकंटक नाहींसा झाला. अलिकडे हेमलता दुःखी नव्हती; तरी ती नेहमीं खिन्न व अधोवदना असे, हें मात्र निःसंशय.

लहानपणीं नरेंद्र वीरनगरास असतांना शैवलिनी त्याला भाऊ ह्मणून हाक मारीत असे, व हेमलताही प्रथम त्याला भावाप्रमाणें चाहात असे. पण पुढें हेमलतेच्या प्रीतीचें रूपांतर निराळेंच झालें होतें, तें मागें सांगितलेंच आहे. अलिकडेस शैवलिनीच्या उपदेशानें मात्र

ती प्रीति पुन्हां बंधुप्रेमावर आली होती. अलिकडे ती बी नरेंद्राची चिंता करीत असे, ती एखादी बहिण आपल्या परागंदा झालेल्या भावासंबंधानें जशी चिंता करीत असते, त्या प्रकारची होती. आतां तिच्या हृदयांत प्रेमशल्य नव्हतें. केवळ बंधुवियोगामुळें होणारें दुःख होतें. एखादे वेळीं बागेंत फिरत असतां बाळपणच्या खेळाची आठवण येऊन तिला नरेंद्राचें स्मरण व्हावें, व त्यामुळें तिच्या डोळ्यांतून एखादा अश्रुबिंदू बाहेर यावा. पण वाचकहो ! हा अश्रुप्रवाह इतर कोणत्याही प्रकारच्या प्रेमाचा दर्शक नसून केवळ बंधुप्रेमाचा दर्शक होय, असें आपण समजा.

रसिक वाचकांनो, तुह्मी कधीं प्रेमप्रवाहांत सांपडले आहांत काय ? तुमची प्रेमाकांक्षिणी व सुखदुःखाची भावी वाटेकरीण तुमच्या वियोगांत तळमळत असतां कालातिक्रम झाला ह्मणून तिनें निरूपायानें वडिलांच्या निकडीनें दुसऱ्यास वरिलें, व तुमची प्रेमप्रतिमा आपल्या हृदयांतून काढून टाकण्याचा उद्योग केला, तर मला वाटतें, तुमच्यासारखे प्रेमप्रवीण तिला अवश्य क्षमा करतील. आणि मीही पण तसें करण्याकरितां तुह्माला विनवीन.

वरील विचार वाचून आमच्या कित्येक रसिक भगिनी ह्मणतील, “ काय मेल्यानें एवढं अवडंबर करून, परपुरुषाच्या प्रेमजाळ्यांत सांपडलेल्या एका स्त्रियेला

पातिवृत्याच्या पांघरूणांत गुंडाळून शेवटीं भ्रातृस्नेहाच्या पडद्यांतून बाहेर काढली ! आणि पुन्हां मेला लोकांना क्षमा करा ह्मणून सांगतो ! क्षमेची का ही गोष्ट आहे !"

पण भगिनींनो ! क्षमेवांचून आह्मी दुसरें काय मागणार ? आह्माला तेवढाच अधिकार आहे. हेमलतेच्या डोळ्यांतून बाहेर आलेल्या आश्रूंला, ते बंधुवियोग दुः-खानें बाहेर आले आहेत, एवढेच आपणास समजवि-ण्याचा यत्न करूं. मग ते इतर भावानें जरी आले असले, तरी हरकत नाहीं. कारण, तो भाव पालटण्यासाठीं बि-चाऱ्या हेमलतेनें किती दुःख सहन केलें, काय त्रास भोगला, हें आपण जाणतच आहांत.

प्रकरण एकुणतिसावें.

पूर्व कथा.

Yet, oh yet thyself deceive not
Love may sink by slow decay.
But by sudden wrench believe not.
Hearts can thus be turn away.

"Byron."

हेमलता व शैवलिनी नदीवरून घरीं परत आल्यावर त्या दोघींनीं मिळून घरचा करण्यासारखा कामधंदा केला व नंतर दोघीही एके जगीं बसून त्यांनीं आपला नित्यक्रम चालविला.

हेमलता म्हणाली–वन्स, फार दिवस झाले, एक सुद्धां कहाणी तुम्ही सांगीतली नाहींत. आज बराच वेळ आहे, तर एखादी कहाणी सांगाना परती!

शैवलिनी प्रेमपूर्वक म्हणाली–हो हो, सांगते. त्यायोगानें रिकाम्या वेळीं मोठी करमणूक होते. बरें पण वहिनी, कोणती कहाणी सांगूं, हें तर सांग.

हेमलता म्हणाली—वन्स, हरिश्चंद्राची कहाणी सांगा. ती ऐकून फार दिवस झाले.

शैवलिनीनें हरिश्चंद्राची कथा सांगण्यास आरंभ केला. त्या कथेंतील नायक नायिकेवर आलेला भयंकर प्रसंग आणि त्या प्रसंगीं त्यांनीं धरिलेलें धैर्य ऐकून हेमलता गहिंवरली व शैवलिनीच्या मांडीवर डोकें ठेवून रडूं लागली.

कथा पुरी होऊन तिचा शेवट गोड झाला. म्हणजे, हरिश्चंद्राच्या सत्यप्रियतेमुळें त्याची राणी व मुलगा ही त्याला पुन्हां प्राप्त झालीं. राज्य मिळालें, संपत्ति मिळाली, सर्व कांहीं मिळालें. हें ऐकून हेमलतेचें हृदय शांत झालें. कांहीं वेळानें हेमलतेनें एक खिडकी उघडून बाहेर पाहिलें, तों समस्त जगत् चंद्रप्रकाशामुळें प्रकाशित झालें असून सायंकालीन वायूच्या योगानें वृक्षराजी हळुहळू हलत असलेली तिच्या दृष्टीस पडली. गंगेचा कलकल शब्दही दुरून तिला ऐकूं येत होता.

शैवलिनीनें हळूंच तिच्याजवळ जाऊन मोठ्या प्रेमानें तिचा हात धरिला, व बाहेर काय पहातेस, म्हणून प्रश्न केला. हेमलता म्हणाली—वन्स, ह्या झाडावर कीटकादि असंख्य जीवजंतु आहेत, त्यांनाही जीवन आहे, त्यांनाही सुखदुःखाची आशा आहे, आणि त्यांचे रक्षणही परमेश्वरच करितो, नाहीं बरें ?

शैवलिनी ह्मणाली. हो हो, त्या कृपासागराला सर्वांची काळजी आहे,

हेमलता सहज सरलतेनें ह्मणाली. वत्स, जो कृपासागर अनाथनाथ आहे, त्या परमेश्वरानें तुह्माला ह्या लहान वयांतच कां बरें विधवा केलें ?

शैवलिनी ह्मणाली—सर्वांच्याच प्रारब्धांत सर्व सुखें नसतात ! मला ईश्वरानें विधवा केलें, पण दुःखी केलें नाहीं. पहा, श्रीश्चंद्रासारखा प्रेमळ भाऊ, तुजसारखी सुशील भावजयी आणि खाण्यापिण्याची सर्वप्रकारची व्यवस्था, हीं कांहीं लहान सुखें नाहींत ? ह्याशिवाय मला आतां कांहीं देखील नको आहे. केवळ एक वेळ सर्व तीर्थांचीं स्नानें करून जन्माचें सार्थक करावें, एवढीच इच्छा आहे.

हेमलता—आपण सर्वजण मथुरा, वृंदावन, इत्यादि तीर्थांस जाणार, असें मागें ठरलें होतेंना.

शैवलिनी—हो ठरलें खरें एकदांचें ! मी पुष्कळच मागें लागलें, तेव्हां कुठें श्रीश्चंद्रानें ती गोष्ट कबूल केली. निघण्याची तिथी सुद्धां जवळचीच आहे.

हेमलता—वत्स, तुमच्याबरोबर मी तीर्थयात्रेस जाईन, हें ऐकून जो आनंद झाला आहे, तो सांगता पुरवत नाहीं. नाना प्रांतांतील नानातीर्थें पहाण्यांत येतील नाहीं बरें ! आणि झालीच, तर नरेंद्रनाथाची भेट ही

होऊन जाईल ! तो ही ह्मणतात पश्चिमेकडेस गेला आहे !

"हो होईलही कदाचित् !" असें ह्मणून तीक्ष्णबुद्धि शैवलिनी किंचित काळजींत पडली. इतक्यांत श्रीश्चंद्र बाहेरून तेथें आला, हें पाहून शैवलिनी एकिकडच्या दारानें तेथून निघून गेली.

बाहेर आल्यावर शैवलिनी मनाशीं बोलूं लागली-हेमलते, तूं माझें वैधव्य पाहून मला अभागी समजतेस. पण वेडे ! स्त्रियांला जी सहन होत नाहीं, ती प्रेमज्वाला तूं सहन केली आहेस. आणि त्या ज्वाळेमुळें तुझें हृदय करपून गेलें आहे. तारुण्याच्या ह्या ऐन भरांत तुझें शरीर दुर्बळ आणि ओठ शुष्क पाहून पहाणाराला कितीबरें वाईट वाटतें ! भोळ्या श्रीश्चंद्राला हें समजत नाहीं ! तूं शहाणी आहेस, आणि ह्मणूनच तूं त्या प्रेमज्वाळेच्या दूर होत आहेस—किंबहुना दूर झालीही असशील ! पण दैवयोगानें नरेंद्राशीं तुझी भेट झाली, तर परिणाम काय होईल, तो नकळे ! असो; त्याचीही चिंता ईश्वरास असेलच.

प्रकरण तिसावें.

तीर्थयात्रा.

Upon her face there was the tint of grief,
The settled shadow of an inward strife,
And an unquiet drooping of the eye,
As if its lids were charged with inshed tears
" Byron "

श्रीश्चंद्राला पाहून हेमलतेस आनंद झाला. श्रीश्चंद्रानेंही प्रेमपूर्वक तिचा हात धरून विचारिलें-" आज प्रकृति बरी आहेना! हेमलता हळूंच म्हणाली, " होय बरी आहे. "

ह्या कुशल प्रश्नाशिवाय विशेष बोलण्याची संधि त्यांना मिळाली नाहीं. श्रीश्चंद्रास जेवूं घालावयास तितक्यांतच शैवालिनी तेथें आली. आणि तिनें पाट मांडून भावास जेवूं वाढलें व आपण जवळ बसून त्याला वारा घालूं लागली. हेमलताही दाराआड बसून श्रीश्चंद्राकडे पहात होती. बहिण भावाच्या पुष्कळशा गोष्टी झाल्यावर

श्रीश्चंद्राचें जेवण संपलें. त्यावेळीं रात्र बरीच झाली होती. यामुळें त्यानें लागलीच बिछान्याची तयारी करण्यास सांगितलें. शैवलिनी तेथून दुसरीकडे निजावयास निघून गेली. नंतर हेमलतेनें श्रीश्चंद्रासमीप जाऊन त्याला विडा दिला. श्रीश्चंद्र आज प्रसन्न असल्यामुळें तो हंसत हंसत तिला ह्मणाला—" मला तो विडा नको " उद्विग्न चित्तानें हेमलता विचारूं लागली, कां बरें ? श्रीश्चंद्र ह्मणाला " अशी एखाद्या दासीसारखी भीत भीत कां ह्मणून विडा देतेस ! " हेमलता खालीं पहात ह्मणाली—कसा देऊं, तें तरी मला कळवायाचं. "

श्रीश्चंद्रानें हें ऐकून प्रेमपूर्वक तिचा हात धरून ह्मटलें—" अग, अझून किती दिवस हें तुझें मुख म्लान राहील ? हें तुझें शरीर एकदांचें निरोग होऊन तूं हंसत मुख दृष्टीस पडावेंस, अशी माझी फार इच्छा आहे. पण ईश्वर ती कधीं पूर्ण करील, तें न कळे ! "

काय उत्तर द्यावें, हें हेमलतेला सुचेना. तिनें एकदां श्रीश्चंद्राकडे पाहून खालीं मान घातली व ह्मणूं लागली—" आतां तर मी बरी आहें. "

श्रीश्चंद्र ह्मणाला—" होय, ईश्वराच्या दयेनें प्रकृति तर एकदांची निवळली, पण मनाला स्वास्थ्य कुठें आहे ?"

हेमलता बालोचित भावानें ह्मणाली—" मनाचें स्वास्थ्य ह्मणजे ? "

श्रीश्चंद्र ह्मणाला—' मनाची प्रसन्नता.'

हेमलता पुन्हां आपल्या पतीकडे पाहून खालीं पहात असतां ह्मणाली–" छे, माझ्या मनांत तर बाई एवढं दिखिल दुःख नाहीं."

बिचारी हेमलता ! ती काय सांगणार ? मनांतल्या दुःखाचें मूळच तिला सांपडत नव्हतें. तिच्या दैवीं उल्हास नव्हताच कीं काय, तें न कळे !

हेमलतेला विशेष समजावून सांगण्याच्या भरीस न पडतां श्रीश्चंद्र तिला ह्मणाला–" हा खिन्नपणा जाऊन तुझें प्रफुल्लित मुखकमल कधीं दृष्टीस पडेल बरें ?

हेमलता कांहींच बोलली नाहीं. ती खालीं पहात बसली होती. इतक्यांत तिला कांहीं आठवून ती किंचित् हास्ययुक्त मुद्रेनें ह्मणाली–" जेव्हां तुह्मी आपली प्रतिज्ञा पुरी कराल, तेव्हां."

श्रीश्चंद्र—कसली प्रतिज्ञा ?

हेमलता—तीर्थयात्रेची.

श्रीश्चंद्र हें ऐकून किंचित् लाजला. हेमलता व शैवलिनी यांच्या ह्मणण्यावरून त्यानें कित्येक वेळां तीर्थयात्रेस चालण्याबद्दल कबूल केलें होतें, पण हा वेळ पावेतों त्यानें आपलें वचन पुरें केलें नव्हतें. हेमलतेच्या वरील उत्तरामुळें तो क्षणक निस्तब्ध राहून ह्मणाला–"जर तीर्थयात्रा केल्यानें तुझी प्रकृति नीट होऊन मनाला स्व

स्थता येईल, असें तुला वाटतें, तर मी उद्यांपासूनच त्या तयारीला लागतों. " हें ऐकून हेमलतेला मोठें समाधान वाटलें. पण स्वाभाविक लज्जेमुळें तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिच्या मनांत ह्यावेळीं आनंदाचें किती भरतें आलें होतें, तें श्रीश्चंद्र तिच्या मुखावलोकनानेंच समजून चुकला, व आनंदीत होत्साता तिला अमळ पुढेंच ओढून तिचें चुंबन घेत ह्मणूं लागला–" ठीक आहे. उद्ईकच मी निघण्याची तयारी करितों. जा आतां, रात्र फार झाली; जेऊन घे. "

हेमलता हळूच स्वयंपाक घरांत गेली. तेथें शैवलिनी तिची वाटच पहात होती. दोघीनींही जेवण आटोपिलें व नंतर हेमलता आपल्या पतीच्या शयनमंदिरांत गेली.

यौवनाचा आरंभ असून अर्धरात्रीचे वेळीं सुकुमारी हेमलता आपल्या पतीच्या शयनमंदिरांत चालली होती, पण तिच्या मनांत यौवनाचा कांहींतरी उद्वेग ? छे, तरुणपणांतील स्वप्नसुखें किंवा आणखी कोणता भाव ह्याचा तिला गंधही नव्हता. ती स्थीर गतीनें आपल्या शयनमंदिरांत जाऊन × × एके बाजूस निजून राहिली. दिवसाच्या कामकाजामुळें थकली असल्यामुळें लवकरच तिला झोंप लागली.

ह्यानंतर कांहीं दिवसांनीं श्रीश्चंद्र घरच्या सर्व मंडळीसह यात्रेस निघाला. गंगातीरावरील सर्व तीर्थें

पाहून शेवटीं मथुरा वृंदावनास जाण्याच्या इच्छेनें तो आग्र्यास आला. तेथें मोठमोठे रजपूत राजे व जहागीरदार ह्यांच्याशीं त्याचा परिचय होऊन त्यांतील एकाच्या वतीनें वर्षप्रतिपदेच्या दिवशीं त्याच्याच कुटुंबाबरोबर आपलेंही कुटुंब त्यानें बादशहाचा महाल व तेथें भरलेला "मीनाबाजार" पहावयास पाठविलें.

वाचकहो! स्मरण आहेना? मागें राजपुताणीच्या वेषानें बादशाच्या आरसे महालांत नरेंद्राच्या दृष्टीस पडलेली हेमलता अझून तुह्माला आठवतेना? भुलूं नका. हेमलता तेथें कशी आली होती, ह्याचा आतां संशय नको.

प्रकरण एकतिसावें.

जलेखेचें पत्र.

The cold in clime are cold in blood,
Their love doth scarce deserve the name,
But mine was like the love of flood,
That boils in Etna's breast of flame.

" Byron. "

आग्रा येथील बादशाही आरसेमहालांत हेमलतेचा मुखचंद्र पाहून नरेंद्र आश्चर्यचकित झाला होता; हें आह्मी मागें सांगितलेंच आहे. कांहींवेळ पर्यंत विचार करून निस्तब्ध आकाशाकडे व शांत यमुनेकडे पहात तो तेथून हळुहळु आपल्या बिऱ्हाडाकडे वळला. घरीं पोंचल्यावर तो आपला स्त्रीवेश काढून ठेवीत असतां त्याच्या वक्षस्थळांतून एक पत्र खालीं पडलें. नरेंद्रानें तें उचलून दिव्या शेजारीं नेलें; व उकलून थोडें वाचून पाहिलें, तों तें उर्दू भाषेंत जलेखेनें आपल्यास लिहिलेलें पत्र आहे, असें त्याला समजलें. ह्मणून तो विस्मित् होऊन तें वाचूं लागला. पत्रांत काय मजकुर होता, हें त्याच्या खालील भाषांतरावरून वाचकांच्या लक्षांत येईल.

प्रियनरेंद्रनाथ.

यांच्या चरणकमलीं.

प्राणनाथ,

मी हतभागिनी वेडी आहें, ह्मणून आपणास हें पत्र लिहीत आहें. ह्या वेळीं माझ्यानें वर मान करून पहावत नाहीं. मस्तक फिरून गेलें आहे. तरी, मरणापूर्वीं आपणास एकदां मनांतलें गुह्य कळवावेंच, ह्मणून हें पत्र लिहीत आहें. हें पत्र ज्या वेळीं तुमच्या हातांत पडून तुह्मी वाचाल. त्यावेळीं ही अभाग्या हा असार संसार सोडून परलोकीं असेल.

शहाजहान बादशाहाची जेष्ट कन्या जहानूआरा हिची मी परिचारिका आहें. ज्या दिवशीं काशीचें युद्ध झालें, त्या दिवशीं कांहीं कारणानें मी व मसरूर खोजा जयसिंहाच्या तळांत होतों. कर्मधर्म संयोगानें, त्याच दिवशीं तुह्माला घायाळ व अचेतन स्थितींत तेथें आणिलें. तुमचें रूप पहातांच माझ्या हृदयाला मदनरूपीं कालसर्पाचा वेढा पडून तें माझ्या ताब्यांत राहिलें नाहीं. त्या विषम विषाचें पान करून तळमळ करित तुमच्या बिछान्यानजिक रात्रीदिवस पडूं लागलें. आणि अनिद्र स्थितींत तुमच्या निद्रित मूर्तिकडे पाहून संतोष मानूं लागल्यें. तुमचे चपळ डोळे, विशाळभाळ, त्याचप्रमाणें आरक्त ओठ पाहून माझें वेडें मन अधिक अधिक वेडें

चार करूं लागे. एखादे वेळीं तुमच्या जखमा ठणकूं लागल्या व त्या योगानें तुम्ही कोणावर त्रासूं लागला, तर मी गप्प राहून मनच्या मनांतच दुःखानें रडत असे. दुःखावेगामुळें एखादेवेळीं तुम्ही स्नेहपूर्वक माझा हात धरिला, तर माझ्या अंगावर रोमांच उभे रहात ! नरेंद्रनाथ ! अशा ह्या तुमच्या सुंदर व कोमल देहांत ईश्वरानें पाषाणाचें हृदय केलें असेल, ह्याचें त्यावेळीं मला स्वप्न देखील पडलें नव्हतें !

कांहीं दिवसांनीं युक्तिप्रयुक्तींनीं तुह्माला नौकेंत घालून मीं दिल्लीस आणिलें व मोठ्या युक्तीनें एकदांचें बादशाही जनानखान्यांत असलेल्या माझ्या बिऱ्हाडीं तुह्माला ठेविलें. तुम्ही त्या वेळीं आजारी असून बेशुद्ध होता, तरी तुमचें मुख पहात अनेक आशातरंगांत भडकत मी तुमच्या पायथ्याशीं बसून रात्रीच्या रात्री काढीत असे.

मसरूर खोजानें ही सारी हकिकत बेगमसाहेबाजवळ सांगितली. मीं जनानखान्यांत पुरुष आणिला, हें एकून त्यांनीं आपणा उभयतांस फाशीची शिक्षा दिली. पण पुन्हां मसरुर खोजानें बेगमसाहेबाजवळ जाऊन काय समजाविलें, तें नकळे. त्यामुळें, ती पूर्वींची शिक्षा रद्द होउन मला कैद व तुमची प्रकृति नीट होतांच तुमची पुन्हां चौकशी करण्याचें ठरलें. मसरुर खोजानें बेगमसाहेबाला काय समजाविलें होतें, तें मला

मागाहून समजलें. त्यानें तुमच्या अपूर्व शौर्याची आणि सौंदर्याची प्रशंसा केली होती.

"मी बंदीवान होऊन रात्रंदिवस कारागृहांत एकटी बसत होतें. नाहीं नाहीं ! एकटी नव्हतें. माझ्या हृदयांत तुमची मूर्ति होती ! नरेंद्रनाथ ! मी तुमच्या जवळ आतां एवढें सुद्धां लपविणार नाहीं. मृत्युसमयीं लज्जेचें काय काम ? कारागृहांत तुम्ही दृष्टीस न पडल्यामुळें माझ्या मनाला जी असह्य पीडा होत होती, तिच्या निवारणाकरितां मसरुरखोजाची व चौकीदारांची खुशामत करून तुमच्या दर्शनाकरितां मी येत असे ! तुमची प्रकृति नीट होऊन तुम्ही शुद्धीवर आलां होतां, तेव्हां तुम्ही मजकडे वारंवार निरखून निरखून पाहिल्याचें तुम्हास आठवतेंना? त्या वेळीं मी तुमच्याशीं कांहीं बोलूं शकत नव्हतें. किंवा फार वेळ थांबूंही शकत नव्हतें. निष्ठूर मसरूर खोजा मला तेथें फार वेळ थांबू देत नव्हता, म्हणून बंदी गृहांत जाऊन तुमच्या चिंतनांत काल घालवीत असे.

कांहीं काळानें तुमच्या चौकशीचा दिवस आला. त्या दिवसाची तुम्हाला आठवण आहे ? सिंहासनावर बसलेली जहानूआरा आणि तिच्या सभोंवती उभ्या असलेल्या तिच्या दासी ह्या तुम्हाला कांहीं तरी आठवतात का ? त्याच दिवशीं बेगमसाहेबानें तुम्हाला पाहिलें होतें. बेगमसाहेबानें तुम्हाला काय शिक्षा दिली तें तुम्हाला आठवतें कां ?

हाय, शहाजादी जहानूआरे ! आमच्या अपराधाला हाच का दंड होता. तूंही स्त्री आहेस. काय तुझें मन कधींच चलबिचल होत नाहीं ! वेडे, मला बंदींत टाकून माझें स्वातंत्र्य तूं हिसकावून घेतलें होतेंस, म्हणून तुझ्यानें माझ्या हृदयांतली प्रणयपिपासा का हिसकणें झालें ! शहाजादे, आम्ही गरीब माणसें फार चांगलीं, पण तुम्ही सिंहासनावर बसणाऱ्या राजकन्या आम्हापेक्षां फार चांडाळणी आहांत ! ईश्वर याचीही शिक्षा तुम्हाला करीलच.

शिक्षा झालेल्या रात्रीं मी तुम्हाला घेऊन कोणत्या युक्तीनें बादशाही जनानखान्यांतून बाहेर पडलें, हें सांगणें अनावश्यक आहे. त्यानंतर तुम्ही गजपतीसिंहाबरोबर लष्करीवेषानें दिल्ली सोडली आणि मींही पुरुषवेष धारण करुन मस्त फकिरी बाण्यानें तुमच्या बरोबर चालल्यें.

नरेंद्रनाथ ! मी तुमची प्रेमभागिनी होईन, ही आशा ह्या हृदयांतून केव्हांच निघून गेली होती. मात्र, रात्रंदिवस तुमच्या समीप राहून तृषित चातकाप्रमाणें तुमच्या मुखकमलाकडे पहात असावें, असें मला वाटे. आणि ह्मणूनच मी दिल्ली सोडून तुमच्या बरोबर क्षिप्रा तिरीं असलेल्या उज्जनीस व तेथून राजस्थानास आल्यें."

प्रकरण बत्तिसावें.

जलेखेचें पत्र–पुढें चालूं.

Or if she fell by bowl or steel,
For that dark love she dared to feel,

"Byron."

नरेंद्रनाथ, तुम्ही ज्या हिंदु स्त्रियेवर (हेमलतेवर) एवढी प्रीति करता, तिला मीं पाहिलें आहें. प्रीति तर तुह्मी फार दाखवितां, पण तिच्याकरितां तुह्मी कधीं वेडे झालेले मला आठवत नाहीं!

माझा जन्म तातार देशांतला. त्या देशांतलीं सारींच माणसें उग्र. पण त्यांतही मी पहिल्या प्रतीची. मी लहान होत्यें, तेव्हां देखील मला फार राग येत असे. त्या रागाच्या आवेशांत मोठमोठीं सशक्त पोरें देखिल मजसमोर येत नसत. एवढेंच नव्हे, तर तीं आपापला खेळ सोडून सुद्धां पळत! मी ज्यावर प्रीति करी, त्याला जवळून मुद्धां दूर होऊं देईना. एकदां एके युद्धांत माझा बाप मारला गेला व त्यामुळें शत्रूंनीं मला पकडून दासी

म्हणून दिल्लीच्या बादशहास विकलें. दासी झाल्यामुळें माझें स्वातंत्र्य गेल्यें, तरी माझा उग्र स्वभाव फिरला नव्हता. उलटा तो जास्त उग्र झाला होता. जणुकाय हिंदुस्थानांतील उष्ण हवेमुळें माझें रक्त उष्ण होऊन माझ्या स्वभावास जास्तच जलाल करीत होतें! बादशाही जनानखान्यांतल्या तातारी स्त्रिया शरीरानें कशा होत्या, हें तुह्मास ठाऊक आहेच. मी तातारी आहें, हें मीं तुह्माला पूर्वी सांगितलेंच आहें. आह्मी साऱ्याजणी बेगम साहेबाच्या महालाचें रक्षण करीत असूं. शिपायाप्रमाणें आह्मालाही तरवारी बरच्या वगैरे हत्यारें वापरावीं लागत. बादशाही जनानखान्यांतल्या बेगमांच्या आज्ञेनें काय काय अत्याचार व साहस कर्में होतात, हें साधारण मनुष्याला कधीं कळावयाचें नाहीं! मी त्यांच्या पापकृत्यांत बहुत करून शिरत नसे. पण जेव्हां मी रागानें देहभान विसरून जाई, तेव्हां त्यांची असाध्य कामेंही उरकून टाकायला कमी करीत नसे. आणि याच गुणामुळें बेगमसाहेब मजवर प्रीति करीत.

मी दिल्ली सोडून तुमच्याबरोबर आल्यें, तरी माझा स्वभाव कांहीं बदलला नव्हता. जशी खुनशी आणि लहरी स्वभावाची जन्मलें होतें, तोच स्वभाव शेवटपर्यंत कायम होता. तुह्माकडे पहात असतांना कधीं कधीं मी ज्ञानशून्य होऊन जाई. पण हें प्रेमामुळें कीं आणखी कशामुळें, तें

मला ठाऊक नाहीं. ह्याप्रमाणें मी तुमच्याबरोबर राजस्थानांत गेल्यें, आणि तेथेंच माझ्या डोक्यावर वज्रपात झाला!

उदेपुरास असतांना तुह्मी नौकेवर बसून तलावांतून फिरत होतां, त्याची तुह्माला आठवण आहे? त्यावेळीं, तुह्माला विचारांत निमग्न पाहून मला वाटे कीं ह्या वीरभूमीच्या दर्शनानें तुमच्या मनांत तिजसंबंधीं विचार येत असावेत.

एकदां नौकेंत माझ्या मांडीवर डोकें ठेवून तुह्मी चंद्रमाकडे पहात पडला होतां आणि मी तुमच्या मुखचंद्राकडे पहात तुमचे अस्ताव्यस्त झालेले केश सांवरीत तुमच्या करांगुलीशीं खेळत बसलें होत्यें, इतक्यांत तुह्मी दीर्घ श्वास घेऊन "हेमलते! तुझी भेट कधीं होईल?" असे शब्द उच्चारिले. मला तुमची भाषा येत नाहीं, पण ह्या शब्दांचा अर्थ मी समजल्यें, आणि त्या योगानें मला राग येऊन मी करकरां दांत खात मूर्च्छित झाल्यें, ह्याचें तुह्माला स्मरणच असेलच.

पहिल्यान्दां मला वाटलें होतें कीं तुम्ही पाषाण हृदयीं आहांत, पण त्या दिवशीं तो भ्रम नाहींसा झाला. "तुम्हाला हृदय आहे; पण तें दुसरीकडे कुठें गुंतलें आहे," हें समजतांच मला फार वाईट वाटलें. मी तुमची 'प्रेमभागिनी' व्हावयास इच्छीत नव्हते, तरी तुमच्याकरितां मी देशोदेशीं हिंडत होते, प्रेमभावानें तुमची पूजा

करीत होतें, आणि तूमच्या अभिलाषानें मी वेडी झालें होतें. असें असून तुम्ही दुसऱ्याच स्त्रीवर प्रीति करता, हें समजतांच मी संतापानें तडफडूं लागल्यें. एवढेंच नव्हे, तर त्या संतापानें वेडी होऊन रात्रीं तुमचा प्राण घेण्याचाही विचार करूं लागल्ये.

ह्या माझ्या आचरणाबद्दल तुम्ही मला दोष द्याल, पण मी तुम्हास हात जोडून सांगत्ये कीं मी बंगालची रीतभात व नीति जाणत नाहीं, किंवा धर्मसंबंधीं उपदेशही मीं कधीं ऐकिला नाहीं. मी अशिक्षित उग्रमति तातारबालिका; जशी वेड्यासारखी प्रेम करीत होत्ये, तशीच तुमचा जीवही घ्यावयास पहात होत्ये. तातार देशाच्या चालीप्रमाणें मी तुमच्या पायाशीं पडल्ये होत्ये, आणि पायथ्याच्या कालसर्पाप्रमाणें तुम्हाला चावण्यासही मी तयार झाल्यें होत्ये. माझीं अशी उन्मत्त स्थिति पाहून तुम्ही मला एक आठवडाभर बांधून ठेविलें होतें, आणि म्हणूनच नरेंद्रनाथ! तुमचा जीव वांचला! आठवड्यानंतर माझा राग कमी होऊन तुम्हास वश करावयाची दुसरी युक्ति शोधूं लागल्ये.

तुमची श्रद्धा हिंदुधर्मावर विशेष आहे हें पाहून, मी एकलिंगेश्वराच्या पुजाऱ्यापैकीं एका गोस्वामीकडे गेल्ये आणि त्याला माझी इच्छा कळविली. हा गोस्वामी मोठा तेजःपुंज व धार्मिक होता. त्यानें माझी हकीकत

ऐकून मला रागानें एक लाथ मारिली व बाहेर हांकून दिलें. ह्याप्रमाणें पुष्कळ गोस्वामी लोकांच्या लाथा खात व अपमान सोशीत अखेरीस त्या काळा पोशाख करणाऱ्या शैलेश्वर नांवाच्या गोस्वामीकडे गेल्यें. तो लोभी असल्यामुळें, तीनशे रुपये किंमतीचा हिऱ्याचा एक दागिना घेऊन माझें कार्य करावयास सिद्ध झाला. मी त्याला पुन्हां एक हजार रुपये किंमतीची एक मौक्तिकमाला दाखवून म्हटलें; गुरुजी, आपण कपटानें, बलात्कारानें किंवा चातुर्यानें नरेंद्राच्या हृदयांतली हेमलतेची मूर्ति नाहींशी करून त्याला मुसलमान कराल आणि मजवर प्रीति करावयास लावाल, तर ही मौक्तिकमाला मोठ्या आनंदानें मी तुमच्या गळ्यांत घालीन.

हा माल मजजवळ कोठून आला, असें कदाचित् तुम्ही विचाराल, तर मी तुम्हाला सांगत्ये कीं बेगमसाहेबाच्या दासींनांहीं पैशाची कमतरता नव्हती. देशोदेशीचे राजे नानाकार्यसाधनास्तव बादशहाच्या भेटीस येत, ते बेगमसाहेबांना ' भेट ' म्हणून पुष्कळ हिरे, मोती, वगैरे देत असत. आम्हा दासीजनांचीसुद्धां ह्या " भेटी " मुळें चंगळ उडे, हें निराळें सांगणें नकोच. असो.

तुम्हाला वश करावयास शैलेश्वरानें काय काय उपाय केले, ते सर्व तुम्हाला ठाऊक आहेतच. सर्व उपाय निष्फळ झाल्यामुळें मी अत्यंत निराश झाल्ये. पर्वताच्या

गृहेंत मी आपला स्वाभाविक स्त्रीवेश घेऊन तुमच्या दृष्टीस पडल्यें. त्यावेळीं तुम्ही मद्याच्या धुंदींत गुंग होता. हें मद्य देवीचें तीर्थ म्हणून शैलेश्वरानें तुम्हाला पाजिलें होतें. तुम्ही त्या धुंदींत मला पाहिलें कीं नाहीं, तें ठाऊक नाहीं; पण मी पहिल्या दिवशीं तुमच्या पायथ्याकडे बसून रडून रडून रात्र काढिली. आणि दुसऱ्या दिवशीं तुमचा प्राण घेण्यास तयार झालें. दोनदां हातांतून तरवार गळून पडली. आम्हां तातारी लोकांच्या हातांतूनही खड्ग गळून पडतें, हें मला पूर्वी ठाऊक नव्हतें. तुमच्या प्रेमचिंतेमुळें मी इतकी दुर्बळ झाल्ये आहें, हें माझ्या मनीं मानसीं देखील आलें नाहीं.

ह्यानंतर मी तुमच्या बरोबर आग्र्यास आल्ये, तेथें थोडा शोध केल्यावर मला समजलें कीं बंगाल्याहून कोणी श्रीमान जमीनदार आले आहेत प्रयत्नांतीं तुमची हेमलतासुद्धां मीं पाहिली. पण पापबुद्धे ! परस्त्री हेमलता आतां काय तुमची राहिली आहे ? हाय ! आतां दुःख नाहीं सहन होत ! आणखी तीन दिवसांनीं तुह्मी मथुरेस जाऊन तेथील मुख्य देवालयांत पाहिजे असल्यास तिची भेट घ्या. जरूर भेट होईल. पण कठोर हृदयी नरेंद्रनाथ ! लक्षांत ठेवा तुह्मी माझ्याशीं जशी वंचना करून मला जसें अभागिनी केलेंत, तसेंच तुम्हालाहीं मी करीन ! आणि ह्मणूनच मीं तुम्हाला वरील बातमी सांगितली आहे.

आग्र्याच्या किल्ल्यांत स्त्रीवेशानें तुह्माला नेऊन हेमलता दाखविली, तें तरी तुमच्या हृदयास डागण्या द्याव्या ह्मणूनच ! माझें मरण जवळ आहे, तरी तार्तार देशच्या धर्माप्रमाणें जीवहिंसा करून मी आपला धर्म पाळीन.

अगाई ! मस्तक देखील फिरूं लागलें ! नरेंद्रनाथ ह्या प्रेमभिकारिणीला तुम्ही थोडीशी तरी प्रेमभिक्षा घातली असती, तर ही मुसलमानीन तुमची अकृतज्ञ कधींही झाली नसती. झालें आतां. ह्या जन्मांत तुमची माझी भेट होणें नाहीं. हीं मी चालल्ये. पाषाणचित्त नरेंद्रनाथ ! आतां खुशाल संसारसुख भोगा. मेल्यानंतर स्वर्गांत तुमची माझी भेट झाली तर, मी हें हृदय विदारून तें किती प्रेमानें भरलें होतें, तें दाखवीन. आणि तुमची सुद्धां मग खातरी होईल. नच झाली, तर ह्या माझ्या कट्यारीनें तुमचें पाषाणहृदय विदारण करीन. बस्.

वेडी " जलेखा. "

येणेंप्रमाणें जलेखेचें पत्र वाचून नरेंद्राचे डोळे भरून आले व त्याला मोठी काळजी उत्पन्न झाली. आणि त्या काळजींतच तो घराच्या बाहेर निघाला.

रात्र नुकतीच संपलेली. शहरांत जिकडे तिकडे शांत. अशा वेळीं नरेंद्र घरून निघून बराच दूर यमुनातिरावर आला. तेथें एके जागीं पुष्कळशीं मनुष्यें एका प्रेतास मध्यें ठेवून त्यासभोंवतीं बसलीं होतीं. नरेंद्रानें त्यापैकीं एकास ' हें काय आहे ! ' असें विचारतांच त्यानें

उत्तर दिलें--" यह मरी हुई औरत बेगम महेलकी बांदी (दासी) थी. और एक काफिर फौजीके साथ जिना (व्यभिचार) कराके भाग गई थी. कयास किया जाता है कि उसीने इसको आज मार डाला है. इसकी छातीमें यही चाकू लगा हुआ था. इस लौंडिका नाम जलेखा है."

नरेंद्रनाथ हें ऐकून भयचकित् होत्साता त्या प्रेताच्या छातींतील कटारीकडे पाहूं लागला, तों ती जलेखेच्या जवळ पाहिलेलीच कट्यार आहे, असें त्यानें ओळखिलें. पत्राच्या मजकुराचा व पहात असलेल्या गोष्टीचा मेळ बसलीत असतां, ' जलेखेनें आत्मघात केला, ' अशी त्याची खात्री झाली.

प्रकरण तेहतिसावें.

मथुरा.

Allured him, as the beacon blaze alluvres,
The bird of passage, till he madly strikes.
Against it and beats out his weary life,
" Tennyson."

यमुना तिरावर असलेली मथुरा नगरी सायंकाळचे वेळीं किती तरी मजेदार दिसत होती ! सूर्य नुकताच अस्तास जाऊन आकाशांत तारे चमकूं लागलें होते. यमुना तिरावर, सायंकाळच्या वाऱ्याच्या लहरीवर लहरी येत

होत्या. सर्व सृष्टि शांत असून वृक्षराजी व कुंजवन यांमधून देवालयें व मोठमोठ्या इमारती ह्यांची शोभा अत्यंत मनोहर दिसत होती.

अशा वेळेस देवालयांतून सायंकाळची पूजा आरंभ झाल्यामुळें शंख व घंटा ह्यांच्या नादानें शहर दुमदुमूं लागलें होतें. यमुनेच्या घाटांवरील एका देवमंदिरांत पुष्कळसें ब्राह्मण व पुजारी लोक उच्च स्वरानें भजन करीत असून, त्यांचें भजन ऐकत बरेच यात्रेकरू सभोंवती जमले होते. अखेरीस भजन संपून आरती झाली व यात्रेकरू आपापल्या बिऱ्हाडीं जाऊं लागले. मात्र दोन स्त्रिया एका वृक्षाखालीं उभ्या राहून परस्पर कांहीं बोलत होत्या. ह्या दुसऱ्या कोणी नसून हेमलता व शैवलिनी होत्या.

हेमलता हंसत हंसत ह्मणाली–"वत्स, त्या वेड्या मुसलमानिनीनें ह्या देवमंदिरांसमोर नरेंद्राशीं भेट होईल ह्मणून भविष्य सांगितलें होतें, पण अजून तर कोठें कांहीं दिसत नाहीं!"

शैवलिनी अत्यंत बुद्धिमान होती, हें मागें सांगितलेंच आहे. ती हेमलतेचें वरील भाषण ऐकून मनाशीं ह्मणाली; जरी हिनें हंसत हंसत ही गोष्ट मला विचारली आहे, तरी ह्यावरून हिच्या मनाचा उद्वेग अजून कायम आहे, हें सिद्ध होतें. "नरेंद्र आज येथें भेटणार,"

ही आशा आज हिच्या मनांत बलपूर्वक आघात करीत आहे, व यामुळें हिचें शरीर क्षणोक्षणीं कंपायमान होत आहे. कदाचित् नरेंद्राच्या भेटीमुळें, हिला बाळपणच्या प्रीतीचा उमाळा येऊन ही भलतें सलतेंच करण्यास तयार होईल व त्यामुळें आमच्या कुलास कलंक लागेल ! असा विचार करून हेमलतेचें ह्मणणें मोडून नेण्याकरितां ती तिला ह्मणाली, " वहिनी, तूं तरी वेडीच आहेस. अग, वेड्या मनुष्याच्याही बोलण्यावर कोणी विश्वास ठेवितो काय? नरेंद्र कुठें? त्याचा बिचाऱ्याचा पत्ता सुद्धां नाहीं ! आणि तूं आपली त्याच्या भेटीची इच्छा करत्येस !

हेमलता—छे छे, मी भेटीची इच्छा करीत नाहीं. मला आपली त्या वेडीच्या बोलण्याची आठवण झाली. पण वन्स, त्या वेड्या जलेखेचें बोलणें पुष्कळदां खरें झालेलें मला आठवतें.

शैवलिनी—अग, एखादे वेळीं तिचें बोलणें खरें झालें, ह्मणून साऱ्याच का गोष्टी तिच्या खऱ्या मानावयाच्या ? पण कायग वहिनी, अझूनपर्यंत दासी कशी आली नाहीं ? मी मेला रस्ता पाहिला नाहीं; नाहींतर, तुला घेऊन घराकडे तरी गेल्ये असत्ये.

हेमलता—अहो, एवढी घाई कशाची आहे ? आतां कुठें नुकताच सांयकाळ झाला ! जाऊं आपल्या आरामानें. हें पहा, हें स्थळ किती रमणीय आहे ! ही यमुनेच्या

घाटांची शोभा पाहून, आपण वीरनगरांत लहानपणीं खेळत असलेल्या स्थलाची आठवण येते. वत्स, ते किती तरी आनंदाचे दिवस होते हो! तुह्माबरोबर, आणि आणखी कित्येकांबरोबर मी किती आनंदानें खेळत असे!!

शैवलिनी "दासी आली नाहीं" ह्मणत घराकडे जावयाची उत्सुकता दाखवूं लागली. पण हेमलता तिकडे लक्ष न देतां तिला ह्मणाली—"वत्स, इकडे पहा, हे नावाडी लोक किती तरी जोरानें नाव वल्हवीत आहेत! अहाहा! जणु काय सरळ तीरच चालला आहे!

शैवलिनी तिकडे पाहूं लागली; पण त्यामुळें तिची चिंता आणखी दुणावली! ती ज्या गोष्टीस भीत होती, तीच पुढें आली! नाव घाटापासून सात आठ हातांच्या अंतरावर असतांच तींतून एक लष्करी थाटाचा मनुष्य उडी मारून घाटावर उतरला. शैवलिनी पाहूं लागली, तों तो मनुष्य दुसरा कोणी नसून नरेंद्र आहे, असें तिनें ओळखिलें.

हेमलता एका झाडाखालीं उभी होती. ती नरेंद्राच्या दृष्टीस न पडल्यामुळें तो नावेंतून उतरून सरळ देवालयांतच गेला. पण हेमलतेनें त्याला पाहिलें होतें, यामुळें तिचें मुखमंडल लाल होऊन सर्व शरीरास कंप सुटला व कपाळावर घर्मबिंदु दिसूं लागले.

तिची अशी स्थिति पाहून शैवलिनीनें घाबरून

तिला धरून ठेविलें. क्षणेक राहून, तिला अमळ बरें वाटलें; तेव्हां शैवलिनी तिला गंभीरतेनें म्हणाली—"वहिनी, मी तुला बहिणीप्रमाणें चहात्ये, हें तूं जाणत्येच आहेस; तेव्हां माझी एक गोष्ट तुला ऐकिली पाहिजे. तूं आज नरेंद्राशीं भेट घेऊं नकोस. एवढें माझें ह्मणणें ऐक. आज भेट घेण्याचा परिणाम नीट होणार नाहीं. मन हें स्वाधीन रहाणारें नव्हे. ह्मणून मी तुला सांगत्ये, घरीं चल."

हेमलता खालीं मान घालून डोळ्यांतून आसवें गाळूं लागली. प्रथम ती कांहीं बोलली नाहीं. पण कांहीं वेळानें अश्रू पुसून स्थिर मनानें ती शैवलिनीस ह्मणाली—"वन्से, तुम्ही आपल्या आचरणामुळें मला माझ्या प्राणापेक्षांही प्रीय आहांत. मला तुम्ही अविश्वासिनी समजूं नये. तुम्ही वेळोवेळीं केलेल्या धर्मोपदेशाचीं तत्वें माझ्या मनांत अझून चांगलीं जागृत आहेत. ह्या पुण्यमूर्तीतल्या ह्या देवमंदिरासमोर मी उभी आहें, खचित सांगतें, मला देवतुल्य पति मिळाला आहे; तेव्हां त्याच्याशीं वंचना करून त्याची अविश्वासिनी ठरण्याइतकी नीचता माझ्या अंगीं नाहीं. वन्स! मजवर विश्वास ठेवा. मला नीच, कुमार्गी समजूं नका." ह्याप्रमाणें ती बोलत असतां तिच्या नेत्रांवाटे अश्रुप्रवाह चालला होता.

हेमलतेचें हें बोलणें ऐकून. शैवलिनीला समाधान वाटलें. ती तिचे डोळे पदरानें पुशीत असतां तिला ह्मणाली,

वहिनी, क्षमा कर. तुजसारख्या धर्मपरायण पतिव्रतेसंबंधानें —कांहीं वेळपर्यंतच कां होईना—संशय घेतल्याबद्दल मला फार वाईट वाटतें.

हेमलता ह्मणाली—वन्स, तुह्मी मजजवळ क्षमा मागावी, हें कांहीं नीट नाहीं. आणि तशी माझी योग्यताही नाहीं. तुमच्यासारखी दयाशील, तुमच्यासारखी नीतिमान व तुमच्यासारखी पापभीरु नणंद मला जन्मोजन्मीं मिळावी, अशी माझी मनापासून इच्छा आहे.

ह्यानंतर दोघींही एकमेकीस धरून स्तब्ध उभ्या राहिल्या होत्या. दोघींच्याही नेत्रांवाटे अश्रुप्रवाह चालला होता. तो स्नेहसूचक अश्रुप्रवाह प्रेमाचा प्रवाहच होता, असें ह्मटलें तरी चालेल. परस्पर प्रीतिमुळें आपण किती सुखी आहोंत, ह्याचें स्मरण होऊन, दोघींही एकमेकीस अश्रुजलानें न्हाणीत असतां शैवलिनी ह्मणाली—रात्र जास्त होत चालली आहे, या करितां जा, लवकर नरेंद्राशीं भेट घेऊन ये. मी तोंवर येथेंच उभी रहात्ये.

शैवलिनी तेथेंच वृक्षाखालीं उभी राहिली व हेमलता देवालयांत शिरली. ती शांत चित्तानें, हळुहळु मोठ्या मर्यादेनें खालीं पहात नरेंद्राजवळ जाऊन बसली. पण तिच्या हृदयांत प्रेमोद्वेग मुळींच नव्हता.

इतके दिवसपर्यंत हृदयांत जपून ठेवलेली हेमलतेची मूर्ति आपल्या प्रत्यक्ष समोर पाहून नरेंद्राचे हृदय

प्रेमानें भरून आलें. त्याच्या शरीरास कंप सुटला, नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले, व तोंडांतून शब्द निघेना. ह्मणून त्यानें प्रेमानें तिचे हात धरिले व तृषित चातकाप्रमाणें तिच्या मुखचंद्राकडे पाहूं लागला. हेमलता हा वेळपर्यंत निश्चळ मनानें बसली होती, पण नरेंद्राची ही स्थिति पाहून तिच्यानें आपलें मन आवरेना. ती खालीं मान करून अश्रु गाळूं लागली.

कांहीं वेळ गेल्यावर नरेंद्राकडे स्थिर दृष्टीनें पहात हेमलतेनें त्याला " नरेंद्रनाथ ! " ह्मणून हाक मारिली.

नरेंद्राला इतक्याच अवधींत तिच्या मुद्रेंत मोठा फेरफार झालेला आढळला. तिची मुद्रा प्रेमोद्वेगविरहित, डोळ्यांतली फाजिल लाज नाहींशी झालेली आणि मुखमंडळ निर्मळ, असें त्याला दिसलें.

प्रकरण चौतिसावें.

माधवी कंकण.

So she strove against her weakness,
Though at times her spirit sank,
Shaped her heart with woman's weakness,
To all duties of her rank.

" Tennyson. "

देवालयांतील सर्व दिवे विझले असून यात्रेकरू आपापल्या बिऱ्हाडीं गेले होते. रात्र चांदणी असल्यामुळें जिकडे तिकडे स्वच्छ प्रकाश पडला होता व विशाळ यमुना लीनतेनें पतिदर्शनास चालली होती. अशा वेळीं यमुना तिरावरील देवालयांत नरेंद्रनाथ व हेमलता शांतभावानें बसले असतां हेमलतेनें गंभीर भावानें म्हटलें-" नरेंद्रा ! फारा दिवशांनीं तुझी माझी भेट झाली. मला वाटतें. आतां ती यापुढें होणें कठीण आहे तेव्हां ह्या वेळींच जें काय परस्परास बोलावयाचें असेल, तें बोलून टाकूं.—

ल्हानपणीं आपण गंगातिरावर खेळत असतां

भावीसुखाच्या कल्पना लढवून मनांत मांडे खात होतों. पण ईश्वरेच्छेनें तूं हल्लीं वीरव्रत धारण करून सेनेंत शिरला आहेस, आणि मी सुद्धां—माझा बापानें दुसऱ्यास दिल्यामुळें–परस्त्री झाल्यें आहें; तेव्हां आपणा उभयतांस बाळपणच्या वृथाकल्पनांवर व कल्पनासुखावर पाणी सोडलें पाहिजे. ब्रह्मदेवानें जर आपणा उभयतांच्या दैवीं आणखी कांहीं लेख लिहिला असतां, तर आपलें जीवन आणखी कांहीं चमत्कारिक झालें असतें. आपलीं बाळपणचीं सारीं स्वप्नें आणि कल्पना खऱ्या झाल्या असत्या-तरी पण त्यानें तसें न केल्याबद्दल आपणास त्याची निंदा करतां कामां नये. त्या परमेश्वरानें तुला वीरोचित पराक्रम देऊन यशस्वी केलें आहे, यासाठीं त्याला अनन्य भावें शरण जाऊन त्याचें स्मरण कर; म्हणजे तुझ्या चित्ताला शांति येईल. मी सुद्धां त्या करुणाघनाचे आभारच मानल्ये. कारण, त्यानें मला देवतुल्य पति व शैवलिनीसारखी नणंद देऊन धनधान्याची स्वामिनी केली आहे." असें म्हणून तिनें दोन्ही हात जोडून ईश्वरास उद्देशून नमस्कार केला. ह्यावेळीं तिचे मुखावर शांति व पवित्र प्रेम ह्यांची छाया स्पष्ट दिसत होती.

नरेंद्रानें विस्मित होऊन हेमलतेच्या मुखाकडे पहात आपले अश्रु पुसले व तोंड फिरवून तो बोलूं लागला–हेमलते, हा वेळपावेतों तुझें खरें हृद्गत मी जाणत

नव्हतों. तुला देवी ह्मणावें कीं मानवी, तें मला कळत नाहीं ! तुजप्रमाणें सहनशील व स्वधर्मनिष्ट स्त्री ह्या जगांत माझ्या दृष्टीस हा वेळपावेतों पडली नाहीं. व पुढेंही पडेल कीं नाहीं याचा संशयच आहे.

दोघेही क्षणेक स्तब्ध झाल्यावर हेमलतेनें बोलण्यास आरंभ केला. ती म्हणाली—नरेंद्रनाथ ! मीं ऐकिलें आहे कीं तूं पुष्कळ युद्धांत जय मिळवून अनेक देश भ्रमण करीत यशध्वज फडकविला आहेस ! ईश्वर तुला सुखी करो आणि असेंच तुझें यश चोहोंकडे पसरो. पण माझी तुला एक विनंती आहे. यदाकदाचित् युद्धांतल्या श्रमांमुळें तुला विश्रांति घ्यावीसें वाटेल, अथवा दैवदुर्विलासानें तुजवर विपत्ति येईल, तर वीरनगरास ये. तुझ्या भेटीनें सर्वांना आनंद होईल. मला माझ्या प्राणेश्वराचें हृद्गत् पूर्णपणें ठाऊक आहे. ते तुला धाकट्या भावाप्रमाणें चाहतात व प्रेमपूर्वक पुष्कळदां तुझी आठवण करितात. तुझ्या भेटीनें त्यांला खरोखर आनंद होईल.

नरेंद्र शांततेनें तिचें बोलणें ऐकत होता. त्याचें हृदय व डोळे प्रेमानें पूर्ण भरले होते.

हेमलता पुन्हां बोलूं लागली—एवढेंच नव्हे, तर शैवलिनी देखिल तुझ्या दर्शनानें समाधान पावेल. आणि मी जोंवर जिवंत आहें, तोंवर लहान बहिणीप्रमाणें तुझी सुश्रुषा करीन. भाऊराया नरेंद्रा ! असें जर झालें, तर माझ्यासारखी सुखी ह्या जगांत मग कोणीच सांपडणार नाहीं.

हेमलतेच्या ह्या स्नेहपरिपूर्ण बोलण्यानें नरेंद्राच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह सुरू झाला व दोघेंहीं क्षणेक स्तब्ध झालीं. पुढें हेमलतेनें गंभीर स्वरानें पुन्हां बोलण्यास सुरुवात केली. ती ह्मणाली—नरेंद्रा ! आणखी एक गोष्ट तुला सांगावयाची आहे. कदाचित् तिजमुळें तुला वाईट वाटेल. पण मी सांगतेच. दुसरें कांहीं मनांत आणूं नकोस. सज्जन दुसऱ्यांच्या दोषांकडे दृष्टि देत नाहींत; गुणांकडे देतात. तेव्हां तूंही त्याप्रमाणेंच कर. तूं वीरनगराहून निघतेवेळीं माझ्या हातास जें प्रीतिदर्शक व प्रेमबंधन ह्मणून **माधवी कंकण** बांधिलें होतेंस, त्याची अधिकारिणी मी आतां नसल्यामुळें, तें मजजवळ रहाणें योग्य नाहीं; यासाठीं तूं हें आपलें परत घे. असें ह्मणून तिनें आपल्या हातावरील पदर दूर केला. नरेंद्र पहातो तों, घरून निघतेवेळीं तिच्या हातास त्यानें बांधलेलें **माधवी कंकण** असून मोठ्या काळजीपूर्वक तिनें ठेविलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. तें ज्या लतेचें केलें होतें, ती वाळून गेल्यामुळें, तें जागोजागीं तुटून त्याचे तुकडे पडूं पहात होते, तरी हेमलतेनें मोठ्या जोपासनेनें त्याला आपल्या जिवापलिकडे वाळगून तें तुटूं नये ह्मणून जागोजागीं सुतानें त्याला गांठलें होतें.

त्या (माधवी) कंकणाला पाहून दोघांनाही आपापल्या बाळपणची आठवण झाली, व दोघेही दुःखित

होत्साते बराच वेळपर्यंत स्तब्ध राहिले. त्या कंकणाकडे पहात असतां नरेंद्राच्या डोळ्यांतून एकसारखा अश्रुप्रवाह चालला असल्यामुळें हेमलतेचा एक बाहू अगदीं भिजून गेला होता. अखेरीस त्यानें एक उष्ण श्वास टाकून तिला ह्मटलें—हेमलते ! तूं मला नेहमींकरितांच विसरणार तर एकूण !

हेमलता ह्मणाली—छे छे, मी तुला विसरणार नाहीं. भावाप्रमाणें सदोदित तुझी आठवण करीन. नरेंद्रा ! हें कंकण तूं माझ्या हातांत प्रणयेच्छेनें घातलें होतेंस, पण गड्या ! आतां मी त्या प्रणयेच्छेची अधिकारिणी राहिल्ये नाहीं; ह्याबद्दल तूं वाईट वाटूं देऊं नकोस. मी किती वर्षेपर्यंत ह्या कंकणाची मनोभावें पूजा करून हें जतन केलें, आणि ह्याचा त्याग करतांना माझ्या किती जिवावर येतें, तें तूं जाणतोच आहेस ! तरि नरेंद्रा ! हें कंकण तूं आपल्या हातानें सोडून घेच. मजवर तुझा प्रणयप्रेम होता, हें तूं विसर; व मलाही विसरूं दे. कारण विश्वासघातकी होऊन आपल्या नवऱ्यास दुःखांत लोटणें ह्यासारखें स्त्रियांना दुसरें पातक नाहीं. आणि तें मजकडून घडूं नये, अशी माझी इच्छा आहे.

नरेंद्रानें कांहीं न बोलतां हेमलतेच्या हातांतून कंकण सोडून घेतलें, तेव्हां ती म्हणाली—नरेंद्रा ! तूं धर्म-परायण आहेस. लहानपणापासूनच धर्मसंबंधीं तुझी आस्था

मी पहात होत्यें. धर्म सोडूं नकोस. ईश्वर तुझें कल्याण करील. त्या करुणाघनानें ज्याला ज्या स्थितींत ठेविलें आहे, त्यानें त्याच स्थितींत संतोष मानावा. फुलें आपला सुगंध चोंहोंकडे पसरून एक दोन दिवसांत कोमेजून जातात; त्याचप्रमाणें, नरेंद्रनाथ ! तूं वीरपुरुष आहेस. वीरोचितकर्म करून स्वदेशास शत्रूपासून सोडीव, व आपली कीर्ति अखंडीत कर. मलाही ईश्वरानें देवतुल्य पति दिला आहे, तेव्हां त्याच्या चरणसेवेखेरीज इतर वासना मला त्या सर्वेश्वरानें देऊं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे.

ह्याप्रमाणें तिचें बोलणें झाल्यावर ती देवालयांत जाऊन प्रेमभावानें देवाच्या पायां पडली. नरेंद्रानेंही तसेंच केलें. नंतर हेमलतेनें नरेंद्राचा हात धरून ह्मटलें–' भाऊराया नरेंद्रा ! रात्र फार झाली, आतां मी जात्ये. ह्या आपल्या धाकट्या बहिणीस विसरूं नकोस.

ती असें बोलत असतां तिचे डोळे पाण्यानें भरून आले. तरी ते पुसून ती देवळाबाहेर निघाली. जोंपर्यंन्त ती नरेंद्राच्या दृष्टीस पडत होती, तोंपर्यंत तो तिच्याकडे पहात होता. ह्यानंतर त्याची जी स्थिति झाली, ती पाहून जगांतल्या अत्यंत दुर्भागी मनुष्यासही वाईट वाटलें असतें. त्याचा शोक अनिवार, त्याचें हृदय दुःखानें करपलेलें व शून्य, आणि मन व्याकुळ झालें.

प्रकरण पस्तिसावें.

प्रयागाचें युद्ध.

Suddenly, as if arrested by fear or feeling of wonder,
Still she stood, with her colourless lips apart while a shudder.
Ran through her frame. ... ...
Sweet was the light of his eyes, but it suddenly sank into darkness,
As when a lamp is blown out by a gust of wind at a casement.

" Longfellow. "

वाचक हो! नायक आणि नायिका ह्यांच्या संबंधानें केवळ एक दोन गोष्टी तुह्माला सांगितल्या कीं आमची आख्यायिका संपली. पूर्वींच्या एका प्रकरणांत आम्हीं सांगितलेंच आहे कीं सुजा दुसऱ्यानदां लढावयासाठीं निघाल्यावर हिवाळ्यांत प्रयागाच्याजवळ त्याच्याशीं औरंगजेबाचें भयंकर युद्ध झालें. दोन दिवसपर्यंत युद्ध झाल्यावर सुजाचा

मोड होऊन तो पळाला. यशवंतसिंहही औरंगजेबाच्या विरुद्ध होता, पण त्याच्यानें औरंगजेबानें कांहींच वांकडें न झाल्यामुळें खट्टू होऊन त्याला आपल्या देशांत परत जावें लागलें. सुजा प्रयागाहून रण सोडून जो पळाला, तो पाटण्यास, पाटण्याहून मोंगिरास व मोंगिराहून राजमहालास गेला आणि तेथून गंगेच्या पार झाला. त्याचा पिच्छा, औरंगजेबाचा मुलगा महंमद व सेनापति मीरजुमला करीत होते. पण जेव्हां हे सर्वजण गंगेच्या पार तंड्यास पोंचले, तेव्हां महंमदानें सुजाच्या कन्येशीं विवाह करून त्याचा पक्ष स्वीकारला. पण सेनापतीनें त्या दोघांचाही मोड केला. नंतर औरंगजेबानें आपल्या मुलाला क्षमा केल्याबद्दल पत्र लिहिलें व त्यावर विश्वास ठेवून त्यानें आपल्या स्त्रीसमवेत सुजाचा त्याग केला. बिचारा सुजा निराधार होऊन अराकानकडे पळाला. पण तेथेंही दुर्दैव त्याच्या पाठीशींच होतें. अराकानला पोंहोंचल्यावर तेथल्या राजाशीं विरोध केल्याचा आरोप त्यावर येऊन, बिचारा बरोबरच्या सर्व लोकांनिशीं कापल्या गेला. आणि त्याची रूपवति राणी प्यारीबानू हिनें त्याच्या मरणामुळें दुःखित होऊन आत्मघात केला. व मुलगी अराकानच्या राजानें आपल्या जनानखान्यांत ठेविली.

ज्यानें वीस वर्षें पर्यंत बंगाल प्रांतावर अधिकार चालविला, युद्धांत साहस व शौर्य दाखविलें, स्वाभाविक

दयेमुळें जो सर्व लोकांनां आवडता झाला, अमरपुरीच्यां इंद्रमहालासारखा ज्याचा महाल, त्या बंगाळच्या सुभेदाराला (सुजाला) मरणसमयीं सुखानें देह ठेवावयालाही जागा मिळूं नये, ही त्या वीधात्याची किती विचित्र लीला! बिचारा, परदेशांत शत्रूच्या हातानें सवंश नाश पावला! शिव शिव ! !

दारा शामनगरच्या लढाईंत पराजित होऊन सिंध देशांत पळून गेला होता, पण औरंगजेबाच्या सैन्यानें त्याला तेथून धरून दिल्लीस आणिलें. नंतर औरंगजेबानें त्याचा पुष्कळ अपमान व हाल हाल करून प्राण घेतला. मुराद कैदेंतच होता. पुढें औरंगजेबानें त्याचा सुद्धां शिरच्छेद केला. ह्याप्रमाणें सहोदर बंधूंच्या रक्तानें स्नान करून औरंगजेब दिल्लीच्या बादशाही तक्तावर बसला.

ज्या रात्रीं मथुरेंत हेमलतेशीं नरेंद्राची भेट झाली होती, तेव्हांपासून नरेंद्राच्या मनांतल्या सर्व आशा नाहींशा झाल्या होत्या. हेमलता आपल्या गांवीं गेल्यावर तिनें त्याचा बंगालभर शोध केला. त्याचप्रमाणें श्रीश्चंद्रानेंही देशोदेशीं जाहिरनामे लाविले कीं, जर नरेंद्र वीरनगरास परत आला, तर त्याच्या बापाच्या जमिनदारीचा अर्धा भाग त्याला मिळेल. पण नरेंद्र कोणाच्या दृष्टीस पडला नाहीं. हेमलता वीरनगरास आल्यावर आपल्या पतीबरोबर सुखानें राहूं लागली. मथुरेच्या देवालयांत हेमलतेनें जें

कांहीं झटलें होतें, त्याचें तिला नीट स्मरण होतें. तिच्या चित्तांतून इतर साऱ्या चिंता पळाल्या. केवळ पतिचरणाच्या भक्तीखेरीज तिला दुसरें कांहीं सुचत नव्हतें.

कांहीं काळ लोटल्यावर हेमलतेला दोन मुली व एक मुलगा अशीं तीन अपत्यें झालीं. मुलींचीं नांवें हेमन्तकुमारी व सरयुबाला आणि मुलाचें नांव प्रताप. वीस वर्षांपूर्वीं, अस्तमानाचे सुमारास हेमलता व नरेंद्र हीं दोघें गंगातटावर जशीं आनंदानें खेळत, त्याचप्रमाणें हेमलतेचीं मुलेंही तशींच आनंदानें हिकडून तिकडे उड्या मारीत असलेलीं तिच्या दृष्टीस पडत. जगाची अशीच स्थिति आहे; एक मंडळी येते आणि एक जाते.

हेमलतेच्या विवाहास सरासरी दहा वर्षें लोटलीं होतीं. एके दिवशीं ती आपल्या मुलांना बरोबर घेऊन एका सन्याशीबुवाच्या दर्शनास गेली. सन्याशीबुवाचा आश्रम वीरनगरापासून कांहीं कोश अंतरावर गंगातिरावर एका शाल्मली वृक्षाखालीं होता. प्रायः शाल्मली वृक्षाच्या शाखा तीन बाजूनें तीन निघतात. त्याप्रमाणें ह्याही वृक्षाच्या निघाल्या असून त्यामुळें, तेथें एक स्वयंभु घरच झालें होतें. त्या घरांत एक अपूर्व सन्याशी बरेच दिवसांपासून रहात होता. वीरनगरांतील बायका व मुलें भक्तीपूर्वक संन्याशी महाराजाला कांहीं खाण्याच्या जिनसा अर्पण करीत, व त्यावर संन्याशी महाराज आपला

निर्वाह करीत. दिवसभर ध्यानधारणेंत निमग्न राहून सायंकाळीं ते गांवांतील दुःखी लोकांचें शांतवन, दुर्बळाला साह्य, विधवा स्त्रियांना धर्मोपदेश इत्यादि कार्यें करून आपली कालक्रमणा करीत. ह्याप्रमाणें ते अर्ध रात्रीपर्यंत लोकांचा समाचार घेऊन, नंतर आपल्या आश्रमांत येत व तृणशय्येवर निद्रा घेत. वर्षाकाल असो, शीतकाल असो, कीं उष्णकाल असो; त्यांच्या ह्या नियमांत अंतर पडत नसे. अशा ह्या अपूर्व व लोकोपकारी सन्याशी महाराजांच्या दर्शनास दूरदूरची मंडळी त्या वृक्षाखालीं जमत होती.

वर सांगितलेंच आहे कीं एके दिवशीं हेमलताही ह्या सन्याशी महाराजांच्या दर्शनास निघाली होती. ज्या वृक्षाखालीं सन्यासाचा आश्रम होता, तेथून कांहीं दूर अंतरावर ती नौकेंतून उतरली. व पायींपायींच त्या पुण्यपावन आश्रमास जावयास निघाली. आश्रमांत आल्यावर, काय म्हणून ते नकळे; पण त्या सन्याशी बुवाकडे ती एकसारखी लक्ष्य लावून पहात होती. कांहीं वेळानें संन्याशी महाराजाचें ध्यान विसर्जन झालें व त्यांची दृष्टि हेमलतेकडे गेली. हेमलतेला पहातांच ते उठून उभे राहिले व तिजकडे निरखून पाहून हळुहळु जवळ येऊन "अष्टपुत्र सौभाग्यवति . भव" असा आशिर्वाद दिल्यावर ह्मणाले–" वत्से ! धन्य तुझें पातिवृत्य व धन्य तुझी

पतिप्रेमनिष्ठा ! परमेश्वर तुला सुखी करो. "

सन्याशीबुवा हें बोलत असतां त्यांच्या नेत्रांवाटे अश्रुधारा चालल्यामुळें त्यांनीं आपलें तोंड फिरवून घेतलें व हळुहळु अरण्याचा रस्ता धरिला. सर्वजण तटस्थ वृत्तीनें पहात होते, पण तिकडे सन्याशीबुवांनीं लक्ष्य न देतां ते रानांत निघून गेले, व त्या दिवसापासून शाल्मली वृक्षाखालच्या आश्रमांत ते कोणाच्याही दृष्टीस पडले नाहींत. ते कोठें गेले, हें देखील कोणाला ठाऊक झालें नाहीं.

~~नरेंद्रनाथ होत.~~

ते सन्यासी नसून नरेंद्रनाथच होते.

समाप्त.

मदनविलासामृतसंजीविनी.

१ वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहबुद्धि—कांतिवर्धक व धातुपौष्टिक. सुवर्ण-माक्षिक मौक्तिक कस्तुरी-मिश्र अपूर्व गुटिका.

शरीराची त्वरीत व उत्तम सुधारणा करून त्यास रोगरहित व अतिशय पुष्ट करणारी जीं औषधें अत्यंत महत्वाचीं आहेत त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतिच्या ठरल्यामुळें यांचे अत्यंत अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या असमंतात अतिशय पसरले आहेत. यांच्या सेवनानें इंद्रिय-शिथिलता, नपुंसकत्व कडकी, जीर्णज्वर, अग्नि मांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य व मूत्रमिश्र, धातुस्राव दुसऱ्या कोण-

त्याही गुप्त कारणांनीं होणारा धातुपात, अनेक धातुविकार, मुत्राची रक्तमिश्रता, विवर्णता, धातूचा पातळपणा, मूत्रमार्गसंकोच, पित्त विकार, मळमळ, जिव्हेची जडता, उन्हाळे, छातींतील रोग, कंठरोग, मनाची उदासीनता, चंचलता, मस्तकशूल, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय मुळव्याधि, भगंदर, मूत्रावरोध, किंवा मूत्रातिरेक, कटिशूल, कटिवात, वातरोग निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधीं मुरलेले विकार, सुतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग, शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी, व चित्तभ्रम, इ० अनेक विकार कितीही वयाचे मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरें होतात. वीर्यस्थंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते, स्त्रियांची धुपणी व संततीस अपायका-

रक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचे त्वरित निवारण होऊन, कांति, स्मरणशक्ति व बुद्धि वाढते. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे, लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांनीं अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो. सुस्ती जाते ज्यास दूध व जडान्न पचत नाहीं त्यास तें भरपूर पचूं लागतें. कोष्ट शुद्धी होते कोष्टांतील अनियमित व्यापारा पासून होणारे दुष्ट परिणाम टळतात.

या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल अनेक सद्वैद्य व ग्राहक यांच्या हजारों सर्टिफिकिटामिळाल्या व नित्य मिळतात, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहींच. औषधांचें कोरडे गुणवर्णन दोषास्पद आहे, परंतु त्यांचें खरें गुणवर्णन सार्वजनिक आरोग्यासच कारणीभूत आहे. आमच्या गुटिका व इतर औषधांचे केलेलें गुणवर्णन त्यांच्या गुणापेक्षां फारच थोडें आहे ह्मणजे वरील वर्णनापेक्षां

त्यांत अत्यंत महत्वाचे असे आणखी अनेक जास्त गुण आहेत व ते " शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे " तसेंच " क्रयविक्रयवेलायां काचः काचोमणिर्मणिः " या न्यायाप्रमाणें ग्राहकांस अनुभवास बरोबरच समजतील व असा जो अनुभव तोच खरा अनुभव होय. औषधांच्या गुणवर्णनरूपी शुष्क पांडित्यानें ग्राहकांचें मन आकर्षित करून औषधें खपविण्याचा मात्र आमचा हा यत्न मुळींच नाहीं हें ग्राहकांनीं पक्कें लक्षांत ठेवून आमच्या अप्रतिम औषधांचा एक वेळ अवश्य अनुभव घ्यावा इतकेंच आज कळवीत आहों. यांत अपायकारक पदार्थ बिलकुल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषधच नाहीं असें हजारों लोकांच्या पूर्ण अनुभवावरून स्पष्ट ह्मणतो. यांस पथ्य सेवनाची गरज नसतां या पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण

करितात यामुळें, यांचा अतिशय खप सुरु आहे. हें निर्विवाद आहे कीं, खऱ्या खऱ्या व्यवसायाची अत्यंत वृद्धि असावयाचीच. आणि सत्य व अत्यंत उपयुक्त वस्तूच्या संग्रहास ग्राहक पूर्ण तत्परही असावयाचेच. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत, शुद्ध, ताजे, महत्वाचे व मूल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे. आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्त केला आहे. आमच्या गुटिका व इतर औषधें अगदीं बिनधोक असून त्यांपासून शेंकडा पंचाण्णवांवर लोक हटकून बरे होतात. आणि बरे झालेले रोग वारंवार बिलकूल व्हावयाचे नाहींत. हे हल्लीं हजारो लोकांच्या अनुभवांवरून पक्कें सिद्ध झालें आहे. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम ६ रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस, बंगीचा सर्व टपालखर्च माफ आहे.

त्याचे आंत घेणारांस मात्र तो वेगळा सहा आणे पडेल. एकदम ३२ गोळ्या १ रु०.७० गो० २ रु० १६० गो० ४ रु० २६० गो० ६ रु० व ५२० गो० १० रु० अनुपानपत्रक सोबत मिळेल.

२ थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे. हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्याचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारें तिमिरांध, वडस, बिंदू, फुलें, कांच, सारा, मोर, गळती, खोपऱ्या, जळजळ, कंडू, फुट, ठणका व लाली इत्यादि अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूळादि. विकारासह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात. दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जाग-

रण, उन्हातून फिरणें, अग्नीचा शेक, उपदंश विकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अति मैथून, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थभक्षण इत्यादि अनेक कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे हें चांगल्या दृष्टीचे मनुष्यांना डोळ्यात घांतल्यास वरील विकार त्यांस बिलकूल होणार नाहींत लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तोळ्याचें डबी १॥ रुपया.

३ कर्णस्त्रावनाशक अप्रतिम तेल.

हें उत्तम तेल कानांत घाल्यानें कानांतून पू वहाणें, तत्संबंधीं ठणका, कंड, दाह, रक्तस्त्राव इत्यादि विकार तात्काळ बरे होतात कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तात्काळ च; परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडी खिळून राहिलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य कोणतीही व्रणइजा किंवा आग वगैरे बिलकूल न होतां अगदीं

खात्रीनें बरें होतात. बाटलीस रु० १ शिवाय ट्पा० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्ही० पी० पार्सलनें खालील पत्त्यावर मागविल्यास पाठवूं अनुपानखर्डा बाटली सोबत.

४ पर्म्यावर अपूर्व मिश्रण—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा तत्संबंधीं दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ० विकारासह या मिश्रणापासून इजा बिलकूल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोड बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच बा० १ रु०

५ दंतरक्षक पूड—ही चोळल्यानें दंतसंबंधीं सर्व विकार, हिरड्यास रक्तस्राव व्रण, पू, कीड, इत्यादि विकार फारच त्वरीत व नाजुक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात डबी ६ आणे.

६ गजकर्ण, नायटे, खरूज इ० विकार ३ दिवसांत बरे होतात ड० ६

विंचवाचे विष—हें औषध लावतांच उत-

रतें ड० ८ आणे हे इतकें औषध ४० मनुष्यास पुरते.

८ वृषणवृद्धि—(अंतर्गळ) हा विकार होण्यास विशेषेंकरून मलाश्रित वायु हें जोरदार कारण आहे. कष्टाप्रहार, मुष्टिहार अव्यवस्थित पतन इत्यादि कारणेंही यांस आहेत. वरील कारणांनीं वृषणाचा एक किंवा दोन्ही भाग मोठे होऊन ठणका, सूज, बाधिरता इ० विकार होतात हे सर्व रोग आमच्या गोळया व मलम यांनीं १०।१२ दिवसांत खात्रीनें बरे होतात अति जुनाट व कितीही जोरदार असलेले रोग ४० दिवसांचे आंत कायम बरे होतात मलम डबीस ८ आणे व २४ गोळ्यांचे डबीस १॥ रुपया. दोन्ही मिळून किंमत २ रुपये दोन्ही औषधांचा एकदम उपयोग करावा लागतो. आमच्या औषधालयांत अनेक रोग हटकून व त्वरित बरे करणारी अशीं उत्तम औषधें हल्लीं तीनशांवर तयार असून, आणखी शास्त्रोक्त अनेक उत्तम औषधें तयार करण्याचा क्रम नित्य जारीनें चालू आहे.

मेदोवायु—या वायूनें शरीर फार मोठें होतें, ह्मणजे पोट, मांड्या, पोटऱ्या, हात, पाय, इ. अवयव फार थूल होतात. हा रोग मुरल्यास पुढें श्वास, अशक्तता, अग्निमांद्य, नष्टवीर्यता, इत्यादि अनेक विकार होण्याचा संभव असतो. तरी हा रोग साधारण असल्यास सुमारें १॥ महिन्यांतच, परंतु कितीही जोरदार किंवा जुनाट विकार ३ महिन्यांत खात्रीनें बरा होऊन प्रकृति उत्तम होते. ४५ गोळ्याचे डबीस १ रुपया व २॥ तोळे तेल बाटली ८ आणे. एकूण किंमत १॥ रुपया.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांचा हजारो लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तंबाखूच्या अर्कांच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधीं अत्तरें व ग्रंथोक्तरसायनें, धातूंची भस्में पाक, तैलें, चूर्ण, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार, हेमगर्भादि रसायनें, मा-

नवी कुटुंबांत नेहमीं होणाऱ्या कित्येक रोगांवर पूर्ण खात्रीच्या औषधांच्या पेट्या इ. औषधें माफक किंमतीत मिळतील. पहाण्यासाठीं सर्व सामानांच्या माहितीचें सूचित्र मोठें पुस्तक (क्याटलाग) मागवावें. तें फुकट पाठवूं अनुपानपत्रक औषधाबरोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य कोणी प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. अत्यंत गरीब व निराश्रित लोकांस मुद्दल किंमतीनें व शक्तिप्रमाणें कधीं कधीं फुकटही औषधें देऊं. पण ग्राहक अत्यंत गरीब व निराश्रित असल्याबद्दल आमची पूर्ण खात्री झाली पाहिजे.

औषधें जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत.

विशेष सूचना —हल्लीं मुर्डी वगैरे गांवांतील कित्येक दांभिक लोकांनीं बनावट औषधें वगैरेच्या भपकेदार जाहिराती अनेक पत्रांतून सुरू करून ग्राहकांच्या डोळ्यांत धूळ फेकण्याचा दृढतर यत्न चालविला आहे. परंतु वैद्यकांतील शारीर, निदान, चिकित्सा इ. महत्वाच्या विषयांचें किंचितही ज्ञान त्यांच्या स्वप्नीं तरी आहे काय? याचा विचार वाचक अवश्य करतीलच. अशा भोंदु लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं वरील ढोंगी लोकांबद्दल आह्मीं वेळोवेळीं सूचना दिल्या आहेत. हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेवावें. अजूनही या लोकांसंबंधानें आह्मांस बरेंच लिहावयाचें आहे तें लिहूंच. हल्लीं आम्ही इतकेंच कळवितों कीं आमचीं शास्त्र पद्धतीनें तयार केलेलीं अत्यंत खात्रीचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक सही व पत्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.

पत्ता—मु. आंजर्लें. ता. दापोली. जि. रत्नागिरी.